रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १७ ◆ अंक ५४
www.ramprahar.com
मंगळवार, १० सप्टेंबर २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

२.५ लाख मुंबईकरांचा कोकणात एसटीने प्रवास/२
बेलापूर पोलीस ठाण्यात शिरला अजगर/६
माणगावच्या साले येथील एक गाव एक गणपती!/७

## ‘दोन वर्षांत इलेक्ट्रिक वाहने पेट्रोल-डिझेल वाहनांच्या दरात’



**नवी दिल्ली :** भारतात दिवसेंदिवस इलेक्ट्रिक वाहनांची मागणी वाढत आहे. सरकारदेखील या वाहनांना प्रोत्साहन देत आहे. दरम्यान, केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्गमंत्री नितीन गडकरी यांनी पुढील दोन वर्षांमध्ये इलेक्ट्रिक वाहनांच्या किमती या पेट्रोल-डिझेलवर चालणाऱ्या वाहनांइतक्याच होतील, असे म्हटले आहे. ते सोमवारी (दि. ९) ऑटोमोटिव्ह कम्पोनंट मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन ऑफ इंडिया (एसीएमए)च्या ६४व्या वार्षिक संमेलनात बोलत होते. त्यांनी म्हटले की, इलेक्ट्रिक वाहन निर्मिती करणाऱ्या कंपन्यांना आता अनुदानाची आवश्यकता भासणार नाही, कारण इलेक्ट्रिक वाहनांच्या निर्मितीवरील खर्च कमी होणार आहे. ग्राहकदेखील आता पेट्रोल-डिझेलवर चालणाऱ्या वाहनांऐवजी इलेक्ट्रिक वाहनांचा पर्याय स्वीकारत आहेत. या वेळी त्यांनी सीएनजी, इथेनॉलदेखील उत्तम पर्याय असल्याचे नमूद केले.

## गणेश दर्शन



**मुंबई : केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी पत्नी सोनल शाह यांच्यासमवेत प्रसिद्ध लालबागच्या राजाचे दर्शन घेतले. या वेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर, भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे, माजी खासदार रावसाहेब दानवे, भाजप मुंबई अध्यक्ष आशिष शेलार आदी उपस्थित होते.**

## शस्त्रसाठ्यासह दरोडेखोर जेरबंद

**पुणे : प्रतिनिधी**

वाढत्या गुन्हेगारीच्या पार्श्वभूमीवर पोलीस यंत्रणा सतर्क झाल्या असून दरोड्याची योजना आखणाऱ्या एका दरोडेखोरोला इंदापूर पोलिसांनी अटक केली आहे. त्याच्याकडून शस्त्रसाठा जप्त करण्यात आला आहे.

सुयश ऊर्फ तात्या सोमनाथ घोडके असे आरोपीचे नाव आहे. तो इंदापुरातील वालचंदनगरमध्ये मित्रांसोबत असल्याची खबर पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांच्या पथकाने संबंधित ठिकाणी सापळा रचून आरोपीला ताब्यात घेतले.

# समृद्धी महामार्ग पुण्याला जोडणार

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई आणि नागपूर शहरांमधील अंतर दूर करणारा समृद्धी महामार्ग अनेक जिल्ह्यांसाठी वरदान ठरला आहे. आता समृद्धी महामार्ग पुण्याला जोडला जाणार आहे. यासाठी पुणे आणि शिरूरदरम्यान प्रस्तावित असलेल्या उन्नत महामार्गाला मंजुरी देण्यात आली आहे.



पुण्याजवळील केसनंद गावातून या उन्नत मार्गाची सुरुवात होणार असून ५३ किलोमीटरचा हा उड्डाणमार्ग शिरूरपर्यंत पोहचणार आहे. त्यासाठी ७५१५ कोटी रुपये खर्च येणार आहे. आता हा प्रस्तावित उड्डाणमार्ग पुढे अहमदनगर आणि तिथून पुढे छत्रपती संभाजीनगरमार्गे समृद्धी महामार्गाला जोडण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यासाठी आणखी २०५० कोटी रुपये खर्च असून एकूण खर्च ९५६५ रुपये इतका येणार आहे. या महामार्गाची एकूण लांबी २५० किमी इतकी असणार आहे.

सध्या अस्तित्वात असलेल्या पुणे-शिरूर-अहमदनगर राज्य महामार्गाला समांतर पद्धतीने नव्या सहा पदरी उड्डाण मार्गाची निर्मिती करण्यात येणार आहे. हा प्रकल्प सार्वजनिक बांधकाम विभागाच्या (पीडब्ल्यूडी) सहाय्याने महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ (एमएसआयडीसी) द्वारे केला जाईल. या महामार्गामुळे पुणे व आजूबाजूचा परिसर समृद्धी महामार्गाशी जोडला जाणार आहे.

# पनवेल परिसरातील पाणी प्रश्नासंदर्भात उपाययोजना करा

## आमदार प्रशांत ठाकूर यांची सिडकोला सूचना

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

पनवेल परिसरातील पाणी प्रश्नासंदर्भात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखालील भाजपच्या शिष्टमंडळाने सोमवारी (दि. ९) सिडकोचे सहव्यवस्थापकीय संचालक गणेश देशमुख यांच्यासोबत बैठक घेतली. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी पाणीपुरवठ्याची समस्या मार्गी लागण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्याची सूचना केली.

पनवेलची पाणी समस्या मार्गी लागावी यासाठी आमदार प्रशांत ठाकूर सातत्याने प्रयत्नशील आहेत. या संदर्भात त्यांची आणि रायगडचे पालकमंत्री उदय सामंत यांची गेल्या महिन्यात बैठक झाली होती. याच अनुषंगाने काही दिवसांपूर्वी त्यांनी महापालिका मुख्यालयात आयुक्त तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व सिडकोचे अभियंता यांची संयुक्त बैठक घेतली. या वेळी न्हावाशेवा टप्पा ३ योजनेचा आढावा



घेत रखडलेली कामे पूर्ण करण्याच्या मागणीवर भर देण्यात आला होता.

यानंतर सिडको परिसरातील पाण्याच्या तुटवड्यासंदर्भात सोमवारी सीबीडी बेलापूर येथील सिडको भवनात बैठक झाली. खारघर, कामोठे, कळंबोली, नवीन पनवेलच्या पाणी प्रश्न सोडवण्यासाठी तातडीने टेंडर काढून कामांना सुरुवात करावी, असे आमदार प्रशांत ठाकूर यांनी या वेळी सांगितले. त्याचप्रमाणे प्रत्येक सिडको नोड, सेक्टरमध्ये प्रत्यक्षात किती पाण्याची आवश्यकता आहे आणि पुरवठा किती होतो याची माहिती घेऊन तसे नियोजन करावे. जीर्ण वाहिन्या व इतर दुरूस्ती करावी. त्याचप्रमाणे जेव्हा गरज भासते तेव्हा फ्लॅट, रहिवाशांच्या संख्येनुसार टँकरचे नियोजन करावे, कामोठ्यासारख्या भागासाठी मुख्य पाणीपुरवठा बंद असेल तेव्हा पर्यायी स्रोताची तयारी ठेवावी यांसारख्या उपाययोजना अमलात आणण्याचे सूचित केले. **(पान २ वर..)**

## निवडक

### हरियाणात काँग्रेसशी बोलणी फिस्कटली; आपची यादी जाहीर

**नवी दिल्ली :** हरियाणा विधानसभा निवडणुकीसाठी काँग्रेस आणि आम आदमी पक्ष यांच्यातील आघाडीबाबतची बोलणी फिस्कटली आहेत. त्यामुळे आपने आता हरियाणामध्ये स्वबळावर निवडणूक लढण्याचा निर्णय घेतला असून आपल्या २० उमेदवारांची यादीदेखील जारी केली आहे. काँग्रेसने उमेदवार जाहीर केलेल्या मतदारसंघातही आपने उमेदवार उतरवले आहेत.

### विनेशच्या काँग्रेस प्रवेशावर काका महावीर फोगट नाराज

**चंदिगड :** कुस्तीपटू विनेश फोगट हिने नुकताच काँग्रेस पक्षात प्रवेश केला तसेच ती आगामी हरियाणा विधानसभा निवडणूकही लढणार आहे, पण तिचा राजकारणात येण्याचा निर्णय काका आणि कुस्तीगुरू महावीर सिंग फोगट यांना आवडलेला नाही. त्यांनी याबाबत जाहीरपणे नाराजी व्यक्त केली आहे. खेळाडूंनी खेळात सर्व आशा गमावल्यानंतरच राजकारणात यावे. विनेशने एक ऑलिम्पिक लढवून नंतर राजकारणात उतरायला हवे होते, अशी प्रतिक्रिया महावीर फोगाट यांनी दिली.

# विवेक पाटीलांची फक्त ९० कोटींची मालमत्ता जप्त

## सुनावणीदरम्यान सरकारी वकिलांचा कोर्टात युक्तिवाद




**पनवेल : प्रतिनिधी**

कर्नाळा नागरी सहकारी बँकेच्या घोटाळाप्रकरणी बँकेचे अध्यक्ष आणि शेकापचे माजी आमदार विवेक पाटील यांच्या जप्त मालमत्तेची किंमत ८०० कोटी नसून फक्त ९० कोटी रुपये असल्याचे सरकारी वकील भोपी यांनी सोमवारी (दि. ९) न्यायालयात युक्तिवाद करताना सांगितले. दरम्यान, पाटील यांच्या जामीन अर्जावर १० सप्टेंबर रोजी सुनावणी सुरूच राहणार आहे.

पनवेल जिल्हा न्यायालयात सोमवारी दुपारी सरकारी वकील भोपी यांनी युक्तिवाद सुरू केला. विवेक पाटील यांचे वकील राहुल ठाकूर यांनी कर्नाळा नागरी सहकारी बँकेत सुमारे ५४३ कोटी रुपयांचा घोटाळा असताना हजार कोटींचा घोटाळा झाल्याचा आरोप खोटा असल्याचे सांगितले होते, मात्र सरकारी वकील भोपी यांनी तो घोटाळा हजार कोटींचा कसा आहे हे न्यायालयात स्पष्ट केले. त्याचप्रमाणे अ‍ॅड. ठाकूर यांनी विवेक पाटील यांची ८०० कोटींची मालमत्ता जप्त केल्याचे सांगितले होते. सरकारी वकील भोपी यांनी जप्त केलेल्या मालमत्तेची किंमत ही त्या वेळच्या खरेदीच्या किमतीवरून धरली जात असल्याने ती फक्त ९० कोटी असल्याचे सांगितले.

सुनावणीवेळी न्यायालयात एसीपी मिना जगताप यांच्यासह फिर्यादी तत्कालीन सहकारी संस्थेचे वर्ग-१चे विशेष लेखा परीक्षक उमेश तुपे उपस्थित होते. न्यायालयाने वेळ संपल्याने पुढील सुनावणी मंगळवारी सुरू ठेवण्यात येईल, असे सांगितले.






**पनवेल : गणेशोत्सवानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर कुटुंबियांच्या शिवाजीनगर येथील निवासस्थानी आमदार प्रशांत ठाकूर व त्यांच्या सुविद्य पत्नी वर्षा ठाकूर यांनी श्री सत्यनारायण महापूजा मनोभावे केली.**

## सख्ख्या भावानेच केली भावाच्या कुटुंबाची हत्या

**नेरळ : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील पोशिर चिकनपाडा येथील तिहेरी हत्याकांडाचा उलगडा झाला आहे. सख्ख्या भावानेच आपल्या भावासह त्याची गर्भवती पत्नी व मुलाची हत्या केल्याची कबुली नेरळ पोलिसांना चौकशीत दिली. आरोपी हनुमंत पाटील व अन्य दोघे सध्या पोलिसांच्या ताब्यात आहेत.

**कर्जतमधील हत्याकांडाची आरोपीकडून कबुली; तीन जण ताब्यात**

गणेशोत्सवाची सर्वत्र धामधूम सुरू असताना पोशिर येथील चिकनपाडा या गावात राहणारे मदन जैतू पाटील, त्यांची सात महिन्यांची गर्भवती पत्नी अनिशा मदन पाटील आणि मुलगा विवेक मदन पाटील अशा एकाच कुटुंबातील तिघांची हत्या करण्यात आली होती तसेच ही हत्या नसून आत्महत्या वाटावी म्हणून आरोपीकडून मृतदेह पाण्यात टाकून बनाव रचण्यात आला होता, मात्र मयतांच्या अंगावर वार केलेले असल्याने पोलिसांनी तपासचक्र फिरवत मदन पाटील याचा भाऊ हनुमंत पाटील याला चौकशीसाठी ताब्यात घेतले. **(पान २ वर..)**

# कॉंग्रेसमधील अंतर्गत कलह चव्हाट्यावर

## प्रतिभा धानोरकरांचे विजय वडेट्टीवारांना अप्रत्यक्ष आव्हान

**चंद्रपूर : प्रतिनिधी**

विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार आणि चंद्रपूरच्या खासदार प्रतिभा धानोरकर यांच्यातील वाद पुन्हा सुरू झाला आहे.

प्रतिभा धानोरकर यांनी रविवारी विजय वडेट्टीवार यांच्या मतदारसंघात जाऊन अल्पसंख्यकांची सत्ता संपवा आणि पक्ष न पाहता कुणबी उमेदवार निवडून आणा, असे आवाहन केले. त्यामुळे कॉंग्रेसमधील अंतर्गत कलह आता चव्हाट्यावर आला आहे.



चंद्रपूरच्या कॉंग्रेस खासदार प्रतिभा धानोरकर यांनी नाव घेतले नसले तरी त्यांचे पक्षांतर्गत विरोधक आणि राज्याचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांच्याकडे त्यांचा इशारा होता.

वडेट्टीवार यांच्या ब्रम्हपुरी मतदारसंघात जवळपास ६० हजार कुणबी मतदार आहेत आणि हीच बाब लक्षात घेऊन धानोरकर यांनी वडेट्टीवारांना पराभूत करण्याचा ब्रम्हपुरी शहरात झालेल्या कुणबी महाअधिवेशनात अप्रत्यक्ष इशारा दिला.

लोकसभा निवडणुकीपूर्वीदेखील प्रतिभा धानोरकर आणि विजय वडेट्टीवार यांच्यात मोठा संघर्ष झाला होता. दिवंगत खासदार बाळू धानोरकर यांच्या अकाली निधनानंतर आपणच लोकसभेचे दावेदार असल्याचा प्रतिभा धानोरकर यांनी उघड दावा केला होता, तर दुसरीकडे विजय वडेट्टीवार यांनी त्यांची मुलगी आणि युवक कॉंगेसच्या प्रदेश सरचिटणीस शिवानी वडेट्टीवार यांच्यासाठी चंद्रपूर लोकसभेच्या उमेदवारीची मागणी केली होती.

याच दरम्यान प्रतिभा धानोरकर यांनी पक्षातीलच काही नेत्यांनी त्रास दिल्यामुळे आपल्या पतीचा मृत्यू झाल्याचा खळबळजनक आरोप केल्याने मोठा वाददेखील झाला होता, मात्र त्यानंतर धानोरकर यांना उमेदवारी मिळाली आणि हा वाद शांत झाला. धानोरकर यांना उमेदवारी मिळाल्यावर वडेट्टीवार यांनी त्यांना गडचिरोली लोकसभेची जबाबदारी असल्याचे सांगत चंद्रपूर लोकसभेतून काढता पाय घेतला. लोकसभेच्या विजयानंतर धानोरकर यांनीदेखील वडेट्टीवार यांच्यासोबत एकाच मंचावर येण्याचं आतापर्यंत टाळले आहे.

लोकसभा निवडणुकीत कॉंग्रेस पक्षाला चंद्रपूर आणि गडचिरोली मतदारसंघात मोठे यश मिळाले होते, मात्र वडेट्टीवार आणि धानोरकर यांच्यातील संघर्ष असाच सुरू राहिला तर विधानसभा निवडणुकीत अनेक ठिकाणी कॉंग्रेसच्या उमेदवारांना याचा फटका बसू शकतो.

# गणेशोत्सवात २.५ लाख मुंबईकरांचा एसटीने प्रवास

**मुंबई : प्रतिनिधी**

गणेशोत्सवामध्ये कोकणात जाण्यासाठी चाकरमान्यांनी एसटीला प्राधान्य दिले आहे. मुंबई, ठाणे, पालघरसह आदी शहरातून जवळपास अडीच लाखांपेक्षा जास्त चाकरमान्यांनी एसटीने कोकणात गेल्या पाच दिवसांत प्रवास केला आहे.



तब्बल ५०००पेक्षा जास्त बसेसद्वारे एसटी महामंडळाने या प्रवाशांची सुरक्षित वाहतूक करून एक नवा विक्रम केला आहे. यासाठी राज्यभरातील विविध आगारातून आलेले १० हजारपेक्षा जास्त चालक-वाहक, यांत्रिक कर्मचारी, पर्यवेक्षक आणि त्यांना मार्गदर्शन करणारे अधिकारी यांनी किरकोळ अपघात वगळता एवढी प्रचंड वाहतूक सुरक्षित पार पाडली. याबद्दल महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ.माधव कुसेकर यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. आता १२ ते १७ सप्टेंबरदरम्यान होणाऱ्या परतीच्या वाहतुकीसाठी कोकणातील रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या विभागातील आगारातून गटआरक्षण व व्यक्तिगत आरक्षणालादेखील चांगला प्रतिसाद मिळत आहे.

गणेशभक्तांचा प्रवास सुखकर व्हावा यासाठी एसटीची वाहतूक सुरळीत करण्याबरोबरच बसस्थानक व बसथांब्यावर एसटीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली कर्मचारी अहोरात्र कार्यरत होते, तसेच कोकणातील महामार्गावर ठिकठिकाणी वाहनदुरूस्ती पथकदेखील तैनात करण्यात आली होती. नादुरूस्त बसेस ना पर्याय म्हणून चिपळूण, महाड व माणगाव आगारात १०० बसेस तैनात ठेवण्यात आल्या होत्या अशी माहिती महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे जनसंपर्क अधिकारी अभिजीत भोसले यांनी दिली आहे.

# पनवेल-मडगावदरम्यान अतिरिक्त गणपती उत्सव विशेष रेल्वेगाड्या

**रोहे : प्रतिनिधी**

रेल्वेने प्रवाशांची अतिरिक्त गर्दी लक्षात घेऊन पनवेल ते मडगावदरम्यान दोन विशेष गाड्या सोडण्याचा निर्णय रेल्वेने घेतला आहे.

रेल्वेकडून चालत येणाऱ्या गाड्यांमध्ये मडगाव-पनवेल-मडगाव विशेष गाडी क्रमांक ०१४२८ विशेष गाडी १५ सप्टेंबर रोजी मडगाव येथून ९.३० वा. सुटेल आणि पनवेल येथे त्याच दिवशी १०.१५ वा. पोहचेल. गाडी क्रमांक ०१४२७ विशेष गाडी १५ सप्टेंबर रोजी पनवेल येथून ११.४५ वा. सुटेल आणि मडगाव येथे दुसऱ्या दिवशी ११ वाजता पोहचेल. या गाडीसाठी पेण, रोहा, माणगाव, वीर, खेड, चिपळूण, सावर्डा, आरवली रोड, संगमेश्वर रोड, रत्नागिरी, आडवली, राजापूर रोड, वैभववाडी रोड, नांदगाव रोड, कणकवली, सिंधुदुर्ग, कुडाळ, झाराप, सावंतवाडी रोड, थिविम आणि करमाळी हे थांबे आहेत.

ट्रेन क्रमांक ०१४२८/०१४२७ गाडीसाठी बुकिंग विशेष शुल्कासह सर्व संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर आणि www.irctc.co.in या संकेस्थळावर मंगळवार (दि.१०)पासून सुरू होईल. तपशीलवार थांबा आणि वेळेसाठी www.enquiry.indianrail.gov.inला भेट द्या किंवा एनटीईएस अॅप डाउनलोड करा असे आवाहन करण्यात आले आहे.



# माणगावात नेत्रतपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर

**माणगाव** : शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल व उद्योजक विजयशेठ मेथा चॅरिटेबल ट्रस्ट माणगावतर्फे बुधवारी (दि.११) मोफत नेत्रतपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर करण्यात आले आहे.



शिबिरात मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी येणाऱ्या रुग्णांनी येताना सोबत आधार कार्ड व रेशन कार्डची झेरॉक्स प्रत आणावी, तसेच मधुमेहाची व रक्तदाबाची औषधे सुरू असल्यास ती देखील घेऊन यावीत. शिबिरात सहभागी होणाऱ्या नेत्ररुग्णांनी नावनोंदणीकरिता विधिता मनीष मेथा (८६९८७४०६४०), सुप्रिया संतोष शिंदे (९०४९६६५५९८) यांच्याकडे संपर्क साधण्याचे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

# अलिबाग वैद्यकीय महाविद्यालयात आता पदव्युत्तर पदवीपर्यंतचे शिक्षण

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात आता पदव्युत्तर पदवीपर्यंतचे शिक्षण घेणे आता शक्य होणार आहे.

दिल्ली येथील डीएनबी बोर्डाने महाविद्यालयासाठी १९ जागांच्या प्रवेशाला मंजुरी दिली आहे. महत्त्वाची बाब म्हणजे या वर्षीपासूनच हा अभ्यासक्रम सुरू होणार आहे, अशी माहिती महाविद्यालयाच्या अधिष्ठाता डॉ. पूर्वा पाटील यांनी दिली.

२०२१पासून अलिबाग येथे वैद्यकीय महाविद्यालयाची सुरुवात करण्यात आली होती. सध्या ३०० विद्यार्थी या महाविद्यालयात शिक्षण घेत असून पुढील वर्षी पहिली बॅच पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण करणार आहे. त्यामुळे महाविद्यालयात पदव्युत्तर शिक्षणही सुरू व्हावे, अशी मागणी विद्यार्थी आणि पालकवर्गातून केली जात होती.

त्यानुसार दिल्ली येथील डीएनबी बोर्डाकडे प्रयत्न सुरू होते. यासाठी प्रस्ताव पाच-सहा महिन्यांपूर्वी महाविद्यालय प्रशासनाने पाठवला होता. यानंतर बोर्डातर्फे महाविद्यालयाची पाहणी करण्यात आली होती. त्यानुसार आता महाविद्यालयात पदवीत्तर शैक्षणिक अभ्यासक्रमाच्या १९ जागांना बोर्डाने मंजुरी दिली आहे. यात पॅथोलोजी तीन, अनेस्थेशिया दोन, पेडीयाट्रीक्स चार, ओबग्या चार, फॅमिली मेडीसिन चार, रेडीलॉजी दोन अशा एकूण १९ जागांना मंजूरी देण्यात आली आहे. प्रवेशप्रक्रीया सुरू होणार आहे.

> **विद्यार्थ्यांना आता पदव्युत्तर शिक्षण अलिबाग मध्येच घेणे सोयीचे झाले आहे. पुढील काळात सर्जरी, आर्थो हे पीजी अभ्यासक्रम सुरू करण्याचा मानस आहे.**
> **-डॉ. पूर्वा पाटील, अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अलिबाग, रायगड**

# नवी मुंबईत दीड दिवसाच्या गणेशमूर्तींचे विसर्जन

**नवी मुंबई : बातमीदार**

श्रीगणेश चतुर्थीपासून प्रारंभ झालेल्या श्रीगणेशोत्सवात दीड दिवस कालावधीतील १० हजार ६७२ श्रीगणेशमूर्तींचे भक्तीमय वातावरणात विसर्जन झाले.

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील २२ नैसर्गिक विसर्जन स्थळे तसेच १३६ कृत्रिम विसर्जनस्थळे अशा १५८ विसर्जन स्थळांवर हे विसर्जन करण्यात आले.

सर्व विसर्जन स्थळांवर आठही विभाग कार्यालयांमार्फत संबधित विभागाचे सहा. आयुक्त तथा विभाग अधिकारी यांच्या नियंत्रणाखाली त्या त्या विभागातील विसर्जन स्थळांवर श्रीमूर्ती विसर्जनासाठी संबधित अधिकारी, कर्मचारी व स्वयंसेवक तत्पर होते.

ठिकठिकाणच्या नागरिकांनी उत्तम विसर्जन व्यवस्था ठेवल्याबद्दल समाधान व्यक्त करीत महानगरपालिकेची प्रशंसा केली.



# पनवेल मनपा हद्दीत दीड दिवसाच्या बाप्पांचे विसर्जन





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गणेशचतुर्थीला गणपती बाप्पा मोरयाच्या जयघोषात शनिवारी लाडक्या बाप्पाचे आगमन झाल्यानंतर रविवारी (दि.८) दीड दिवसाच्या गणरायांचे पुढच्या वर्षी लवकर येण्याचे आवाहन करीत पनवेलकरांनी भावपूर्ण निरोप दिला.

आयुक्त मंगेश चितळे यांच्या निर्देशानुसार, महापालिकेच्या वतीने यावर्षी ८९ ठिकाणी विसर्जनाची सोय करण्यात आली होती. यामध्ये ४१ ठिकाणी नैसर्गिक विर्सजन ठिकाणे असून ४८ ठिकाणी कृत्रिम तलावांची विसर्जनासाठी सोय करण्यात आली आली होती. या ४८ कृत्रिम ठिकाणीही शाडू मातीच्या गणपतींसाठी वेगळे तलाव व प्लॅास्टर ऑफ पॅरीसच्या गणपतींच्या विसर्जनासाठी वेगळ्या तलावांची सोय करण्यात आली होती. या सर्व विसर्जनाच्या ठिकाणी सुरक्षारक्षक, विद्युत व्यवस्था, सीसीटिव्ही स्टेज, टॉवरची सोय, टेबल खुर्च्या, लाऊड स्पीकर, निर्माल्य कलश, लाईव्ह जॅकेटची सोय करण्यात आली होती.

### महापालिकेतर्फे पाच विशेष निर्माल्य रथ

पालिका क्षेत्रातील २५०पेक्षा जास्त गणेश मंडळांच्या मंडपामध्ये जाऊन दररोज निर्माल्य गोळा करण्यासाठी व विसर्जन स्थळांवरील निर्माल्य गोळा करण्यासाठी स्वच्छता व घनकचरा विभागाचे उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांच्या सुचनेनुसार विशेष पाच निर्माल्य रथ तयार केले आहेत. दीड दिवस गणपतीच्या विसर्जनावेळी साडेसहा हजार टन निर्माल्य गोळा करण्यात आले. या निर्माल्यापासून अगरबत्ती व धुप कांडी करण्यात येणार आहे. याबरोबरच विसर्जन घाटावरील स्वच्छतेसाठी विशेष पथकांच्या माध्यमातून स्वच्छता करण्यात आली.

# वर्षा निवासस्थानी शेतकरी, पोलीस, स्वच्छता कर्मचाऱ्यांकडून गणरायाची मनोभावे आरती

**मुंबई** : मुख्यमंत्र्यांच्या वर्षा निवासस्थानी विराजमान झालेल्या गणरायाची आरती सोमवारी (दि.९) शेतकरी, पोलीस, स्वच्छता कर्मचारी यांच्या हस्ते करण्यात आली. या वेळी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, माजी खासदार राहुल शेवाळे उपस्थित होते.

हिंगोली जिल्ह्यातील लोहारा येथील काही शेतकरी मुख्यमंत्र्यांना भेटायला आले होते. त्यांच्या हस्ते गणपतीची दुपारची आरती करण्यात आली. हिंगोली जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांची घरे, शेती पूर्णपणे वाहून गेली. त्यासंदर्भात बालाजी आढळकर, सखाराम बोडके, उमेश चव्हाण हे शेतकरी मुख्यमंत्र्यांना भेटायला आले होते. त्यांच्या हस्ते आरती झाल्यानंतर खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी शेतकऱ्यांची भेट घेऊन विचारपूस करीत त्यांना दिलासा दिला.



**पान १ वरुन**

## पनवेल परिसरातील पाणी प्रश्नासंदर्भात उपाययोजना करा

या बैठकीला भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, भाजप जिल्हा सरचिटणीस व माजी नगरसेवक प्रकाश बिनेदार, नितीन पाटील, खारघर मंडल अध्यक्ष प्रवीण पाटील, कामोठे मंडल अध्यक्ष रवींद्र जोशी, कळंबोली मंडल अध्यक्ष रविशेठ पाटील, माजी नगरसेवक संतोष शेट्टी, हरेश केणी, डॉ. अरुणकुमार भगत, एकनाथ गायकवाड, समीर ठाकूर, शत्रुघ्न गायकवाड, नरेश ठाकूर, बबन मुकादम, अमर पाटील, तालुका सरचिटणीस प्रल्हाद केणी, किर्ती नवघरे, सचिन वास्कर, प्रभाकर जोशी, जयदास तेलवणे, जगदिश घरत, इर्शाद शेख, साजिद पटेल, मोहन म्हात्रे तसेच सिडको पाणीपुरवठा विभागाचे मूळ, गायकवाड आदी उपस्थित होते.

## सख्ख्या भावानेच केली भावाच्या कुटुंबाची हत्या

मयत मदन आणि भाऊ हनुमंत यांच्यात घरावरून वाद सुरू होते. गेले चार महिने हा वाद वाढला होता. राहते घर मदनच्या नावे होते. त्यातील अर्ध्या घराच्या हिश्शाची घरपट्टी आपल्या नावे कर अशी मागणी हनुमंत भावाकडे मागणी करीत होता. यातूनच हनुमंतने भाऊ व त्याच्या संपूर्ण कुटुंबाला संपवले.

या घटनेचा तपास नेरळ पोलीस आणि स्थानिक गुन्हे अन्वेषण विभाग संयुक्तपणे तपास करीत असताना पोलिसांना एक गोष्ट कळली की, हनुमंतला क्राईम पिक्चर बघण्याची सवय आहे. अजय देवगणचा दृश्यम चित्रपट हनुमंत गेले काही महिने सतत पाहत होता. त्याचाच आधार घेत त्याने आधी आपल्या पत्नीला गणपतीचे निमित्त करून बाहेर पाठवले आणि नंतर हा सारा प्रकार केला, मात्र पोलिसांनी चौकशीमध्ये आपला खाक्या दाखवल्यावर त्याने गुन्ह्याची कबुली दिली. तो व त्याच्या दोन साथीदारांना पोलिसांनी ताब्यात घेतले असून अधिक तपास सुरू आहे.

## पतीच्या विवाहबाह्य संबंधामुळे तरुणीने केली आत्महत्या

**पुणे :** पतीच्या विवाहबाह्य संबंधामुळे तरुणीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना हडपसर भागातील भेकराईनगर परिसरात घडली. या प्रकरणी पतीविरूद्ध पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

तेजश्री आकाश उदमले (वय २२ रा. शिक्षक कॉलनी, भेकराईनगर, हडपसर) असे आत्महत्या केलेल्या तरुणीचे नाव आहे. याप्रकरणी आकाश अशोक उदमले (वय २५) याच्याविरूद्ध हडपसर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत तेजश्रीची आजी देऊबाई पांडुरंग नेटके (वय ६५, रा. कोरेगाव, कर्जत, जि. अहमदनगर) यांनी हडपसर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. आकाश आणि तेजश्री यांचा मार्च २०१९मध्ये विवाह झाला होता. विवाहानंतर आकाशचे एका तरुणीशी अनैतिक संबंध असल्याची माहिती तेजश्रीला मिळाली. तिने याबाबत त्याच्याकडे विचारणा केली असता, आकाशने तिला मारहाण केली. त्याचा त्रास असह्य झाल्याने तेजश्रीने गळफास घेऊन आत्महत्या केली.

# नवी मुंबई लायन्स क्लबतर्फे १२५ शिक्षकांचा सन्मान

**नवी मुंबई : बातमीदार**

शिक्षक दिनाचे औचित्य साधून नवी मुंबईतील लायन्स क्लबच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी आर्ट ऑफ लर्निंगच्या साहाय्याने पुणे विद्यार्थी गृहाच्या नेरूळ येथील विद्याभवन शिक्षण संकुलातील शिक्षकांचा सन्मान केला.

विद्याभवन शिक्षण संकुलाने गेल्या २४ वर्षात शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात अद्वितीय अशी कामगिरी केली असून यामागे या संकुलातील शिक्षकांसह प्रत्येक घटकाचे मोठे योगदान आहे. यासाठी आर्ट ऑफ लर्निंगच्या साहाय्याने लायन्स क्लब ऑफ नवी मुंबई चॅम्पियन्सच्या पदाधिकाऱ्यांनी सर्व शिक्षकांचे कौतुक केले आणि शिक्षकांना 'शिक्षक रत्न' प्रमाणपत्राने सन्मानित केले. या वेळी सर्व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचादेखील सन्मान करण्यात आला. वेदिका खोत आणि इतर विद्यार्थ्यांनी सामुहिक योगा प्रत्यक्षिके सादर केली.

समाज घडवण्यात शिक्षकांचे योगदान मोठे असून त्यांचा समाजातील प्रत्येक घटक ऋणी आहे, असे विचार संजीव सूर्यवंशी यांनी व्यक्त केले.

या कार्यक्रमास पुणे विद्यार्थी गृहाचे कुलसचिव दिनेश मिसाळ, लायन क्लब जिल्हा प्रशासक संजीव सूर्यवंशी, प्रवीण सरनाईक, चार्टर्ड प्रेसिडेंट प्रताप मुदलीयार, लायन किर्ती सूर्यवंशी, नमिता मिश्रा, विजय गणत्रा, रीना अग्रवाल, गुंजन सलूजा, निर्मला अरोरा, हरी अरोरा, हेमंत लोणकर, राजेश जगदीश तसेच इतर पदाधिकारी, शिक्षक उपस्थित होते.




**दुखवटा**

### नरेश म्हात्रे



**कर्जत** : तालुक्यात ३० वर्षे सेवा दिलेले उरण येथील आवरे येथील मूळचे रहिवाशी असलेले नरेश धर्माजी म्हात्रे यांचे आकस्मिक निधन झाले. ते शिक्षक क्षेत्रात एनडी या नावाने ओळखले जायचे. सध्या कोलिवली येथील जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक म्हणून कार्यरत होते. कलावंत आणि कवी असलेले असलेले नरेश म्हात्रे यांचा पहाडी आवाजामुळे त्यांनी स्वतः रचलेले पोवाडे लक्षणीय होते. मागील काही महिने कर्करोगाने ते त्रस्त होते. रुग्णालयात उपचार घेत असताना त्यांचा मृत्यू झाला.

# तीर्थ दर्शन योजनेसाठी शिबिर

## पनवेलमध्ये ज्येष्ठ नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका कार्यक्षेत्रातील ६० वर्षांवरील नागरिकांना मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजनेचा लाभ देण्याकरिता सोमवारी (दि. ९) आयुक्त मंगेश चितळे यांच्या सूचने आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहामध्ये विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले.

याठिकाणी लाभार्थ्यांच्या नोंदणी सहित वैद्यकिय प्रमाणपत्रासाठी आरोग्य तपासणीची सुविधादेखील देण्यात होती. या एक दिवसीय विशेष शिबीरास ज्येष्ठ नागरिकांचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. या ठिकाणी उपायुक्त संतोष वारुळे, मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. आनंद गोसावी, डॉ. सुरेश पंडित, समाज विकास अधिकारी स्वप्नाली चौधरी, अधीक्षक प्रकाश गायकवाड, अधीक्षक राजेंद्र डोंगरे, वैद्यकीय अधिकारी, पीएमएवाय विभागाचे अधिकारी, महापालिका अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

ज्येष्ठांना देशातील महत्त्वाच्या तीर्थक्षेत्राची मोफत यात्रा करण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजनेची घोषणा केली आहे. पनवेल महापालिका कार्यक्षेत्रातील जेष्ठ नागरिकांना या योजनेचा लाभ देण्यासाठी सोमवारी आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहामध्ये विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले. या वेळी संध्याकाळी ५ वाजेपर्यंत सुमारे ८५-९० ज्येष्ठ नागरिकांनी योजनेचा अर्ज भरला.

याचबरोबर मंगळवार १० सप्टेंबरपासून चारही प्रभागांमध्ये मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजनेचा लाभ देण्यासाठी चार विशेष मोबाईल व्हॅन सुरू करण्यात येणार आहेत. या मोबाईल व्हॅन सोसायटी सोसायटी तसेच घरोघरी जाऊन जेष्ठ नागरिकांचे अर्ज भरणार आहेत. अर्ज भरण्याबरोबरच या मोबाईल व्हॅनमध्ये वैद्यकीय तपासणी करून संबधित लाभार्थींना शारीरिकदृष्ट्या निरोगी आणि प्रस्तावित प्रवासासाठी सक्षम असल्याचे प्रमाणपत्र देणार आहेत. ज्येष्ठ नागरिकांनी या सुविधेचा लाभ घ्यावा असे आवाहन आयुक्त मंगेश चितळे यांनी केले आहे.





### अशी आहे योजनेसाठी आवश्यक पात्रता

१. लाभार्थी महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असणं आवश्यक
२. वय वर्ष ६० आणि त्यावरील ज्येष्ठ नागरिक
३. लाभार्थी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रक्कम २.५० लाखांपेक्षा जास्त नसावे.
४. मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजने'चा लाभ घेण्यासाठी कागदपत्र आवश्यक कागदपत्रासह योजनेच्या लाभासाठी ऑफलाईन अर्ज करावा लागेल.
५. लाभार्थ्याचे आधार कार्ड/रेशनकार्ड
६. महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र
७. महाराष्ट्र राज्यातील जन्म दाखला. (लाभार्थ्यांचे अधिवास प्रमाणपत्र उपलब्ध नसेल तर त्याऐवजी त्या लाभार्थ्याचे १५ वर्षापूर्वीचे रेशन कार्ड, मतदार ओळखपत्र, शाळा सोडल्याचं प्रमाणपत्र, जन्म दाखला या चारपैकी कोणतेही ओळखपत्र/प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येईल.) सक्षम प्राधिकारी यांनी दिलेला कुटुंब प्रमुखांचा उत्पन्नाचा दाखला (वार्षिक उत्पन्न २.५० लाखांपर्यंत असणं अनिवार्य) किंवा पिवळे/केशरी रेशनकार्ड

**कागदपत्राचा तपशील**

१. अर्जाची मूळ प्रत

२. अर्जदाराचे आधार कार्ड / रेशन कार्ड (स्वयं साक्षांकीत प्रत)

३. महाराष्ट्र राज्याचे रहिवासी असल्याबाबत अर्जदाराचे अधिवास प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्यातील जन्म दाखला किंवा अर्जदाराचे १५ वर्षापूर्वीचे रेशन कार्ड किंवा मतदार ओळखपत्र किंवा शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र (यापैकी कोणतेही एक)

४. सक्षम प्राधिकारी यांनी दिलेला कुटुंब प्रमुखांचा उत्पन्नाचा दाखला (वार्षिक उत्पन्न २.५० रुपये लक्षपर्यंत असणे अनिवार्य) किंवा अंत्योदय अन्न योजना (एएवाय) किंवा प्राधान्य कुटुंब योजना (पीएचएच) किंवा वार्षिक उत्पन्न २.५० रुपये लक्षच्या आत असलेले मात्र प्राधान्य कुटुंब नसलेले (एनपीएच) शिधापत्रिकाधारक (यापैकी कोणतेही एक)

५. शासकीय वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दिलेला शारीरिक दृष्ट्या निरोगी आणि प्रस्तावित प्रवासासाठी सक्षम असलेचे अर्जदाराचे मूळ वैद्यकीय प्रमाणपत्र

६. लाभार्थ्यांच्या बरोबर येणाऱ्या जीवनसाथी किंवा सहायकाचे शासकीय वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दिलेला शारीरिक दृष्ट्या निरोगी आणि प्रस्तावित प्रवासासाठी सक्षम असलेचे वैद्यकीय प्रमाणपत्र

७. अर्जदाराचे सदर योजनेच्या अटी व शर्तीचे पालन करण्याबाबत आणि अपात्रता नसलेचे हमीपत्र

८. जवळच्या नातेवाईकाचे प्रमाणपत्र

९. वय वर्षे ७५ असलेल्या अर्जदाराचे मदतनीस (जीवनसाथी / सहायक)चे मूळ वैद्यकीय प्रमाणपत्र

१०. जाणाऱ्या जीवनसाथी / सहायकाचे आधार कार्ड

११. अर्जदारासोबत जाणाऱ्या जीवनसाथी / सहायकाचे हमीपत्र

# डिझेल चोरीप्रकरणी तीन व्यक्तींविरोधात गुन्हा दाखल

**पनवेल : वार्ताहर**

एसटीमधून डिझेलची चोरी केल्याप्रकरणी तीन अनोळखी इसमाविरोधात खारघर पोलीस ठाण्यात बीएनएस कलम ३०३(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

उदय मोरेश्वर जोशी हे महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळामध्ये चालक म्हणून नोकरी करतात. गुहागर ते मुंबई बस (एमएच २० बी एल १५६८) ही गौरी गणपती ज्यादा वाहन असे कर्तव्य नेमले असता त्यांच्यासोबत दिलीप रिंडे व शिवानंद घुगे यांची नेमणूक करण्यात आली. ते फ्रेश होण्यासाठी त्यांनी खारघर टोल नाका येथे पहाटे साडेतीन वाजता गाडी थांबवली व ते गाडीतून खाली उतरले. ते गाडीपासून काही अंतरावर बोलत थांबले असताना पांढरी मारुती सुझुकी एर्टिगा गाडीत दोन ते तीन व्यक्ती अंगात शर्ट न घातलेले उघड्या अवस्थेत खाली उतरले. आणि डिझेल गाडीतून डिझेल चोरी करत होते. ते डिझेल चोरी करत असताना आरडाओरडा करण्यात आला.

या वेळी ते त्यांचे एर्टिगा कार भरधाव वेगाने घेऊन पळून गेले. दरम्यान, त्यांनी १४० लिटर डिझेलची चोरी केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# गुटख्याचा लाखोंचा साठा हस्तगत

**दोन आरोपी गजाआड**

**पनवेल : वार्ताहर**

लाखो रुपये किंमतीचा गुटखा साठा नवी मुंबई पोलिसांच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाने हस्तगत केला असून या प्रकरणी दोघा जणांवर कारवाई करण्यात आली आहे.

सर्वेशकुमार मोहनलाल मौर्या (वय २२) व शामु शिवगोविंद मौर्या (वय २४) हे दोघे उलवे सेक्टर २३मध्ये राहणारे असून ते परराज्यातून छुप्या पद्धतीने गुटखा आणून त्याची विक्री पनवेल परिसरात व नवी मुंबई परिसरात करीत असल्याची माहिती नवी मुंबई पोलिसांच्या अंमली पदार्थ विरोधी पथकाला मिळाली. त्यानुसार अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे वरिष्ठ निरीक्षक संदीप निगडे, सहाय्यक निरीक्षक श्रीकांत नायडु, सचिन कोकरे व त्यांच्या पथकाने या दोघांना सापळा रचून त्यांच्या गाडीसह ताब्यात घेतले. त्यांच्या गाडीमध्ये महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेला गुटखा, पानमसाला व सुगंधीत तंबाखुचा साठा असा मिळून जवळपास एक लाख एक हजार ८८० रुपये किंमतीचा माल आढळून आल्याने तो साठा जप्त केला आहे व या दोघांना ताब्यात घेण्यात आले आहे.



**पनवेल : महापालिकेने केलेल्या आवाहनानुसार स्वत: आयुक्त मंगेश चितळे यांनी आपल्या घरी पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करून कृतीशील संदेश दिला आहे. त्यांनी घरच्या घरी शाडू मातीपासून बनविलेल्या श्रीगणेश मूर्तीचे घराच्या आवारातील कृत्रिम हौदामध्ये विसर्जन केले.**

# रेशन धान्याच्या वितरणामधील समस्या सोडविण्याची मागणी

## दर्शना भोईर यांचे तहसीलदारांना निवेदन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल शहर परिसरातील रेशन धान्याच्या वितरणामध्ये उद्भवणाऱ्या समस्या सोडवा, अशी मागणी माजी नगरसेविका दर्शना भोईर यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी पनवेल तहसीलदारांकडे निवेदन दिले आहे.

दर्शना भोईर यांनी निवेदनामध्ये म्हटले आहे की, पनवेल शहरातील रेशन मिळणारे दुकान क्रमांक १५ पाण्याच्या टाकीजवळ व दुकान क्रमांक ३ गणेश मार्केटजवळ स्थलांतरीत करण्यात आलेले आहे. त्यामुळे या परिसरातील सर्व सामान्य नागरिकांना रेशनचा पुरवठा व्यवस्थितरित्या होत नाही. त्यामुळे या परिसरातील सर्व सामान्य नागरिकांना रेशनचा पुरवठा व्यवस्थितरित्या होत नाही व नागरिकांना अनेकदा या ठिकाणी हेलपाटे मारावे लागतात. यामध्ये त्यांचा बराच वेळ खर्च होतो व गैरसोयही होते. यासोबतच अनेक ज्येष्ठ नागरिकांचे यामुळे हाल होतात. त्यामुळे नवीन पनवेलला स्थलांतरीत करण्यात आलेली दुकाने तत्काळ पनवेल शहरातील मध्यवर्ती ठिकाणी सुरू करणे आवश्यक आहे.

पनवेल शहर परिसरातील इतरत्र स्थलांतरीत करण्यात आलेली दुकाने पनवेल शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी पुन्हा आणुन नागरिकांना रेशन पुरवठा सुलभपणे करून देऊन उपकृत करावे, असेही भोईर यांनी निवेदनात नमुद केले आहे.

# भाजप कार्यकर्ते मुकुंद गावंड यांच्यातर्फे ७०० टी-शर्टचे वाटप



**उरण : वार्ताहर**

उरण तालुक्यातील पिरकोन भाजप कार्यकर्ते व उरण तालुका भाजप उपाध्यक्ष मुकुंद गावंड यांच्या संकल्पनेतून गणेश जयंतीचे औचित्य साधून उरण पूर्व विभागात कार्यकर्ते मित्रपरिवार यांना ७०० टी-शर्ट भेट देण्याचा उपक्रम नुकताच हाती घेतला.

टी-शर्टचे अनावरण पनवेलचे विद्यमान आमदार प्रशांत ठाकूर व उरण विधानसभेचे आमदार महेश बालदी यांच्या हस्ते करण्यात आले. मुकुंद गावंड हे सतत समाज उपयोगी कामे करीत असतात तसेच सामाजिक प्रश्नांना वाचा फोडत असतात. त्यांची पत्नी बिंदू मुकुंद गावंड ह्यासुद्धा मदत व सहकार्य करीत आहेत.

दोन निराधार, गरजू महिलांना दुकानासाठी लागणारा इलेक्ट्रिक वजन काटा देवून मदत केली आहे. शाळेला पंखे व शालोपयोगी वस्तू देवून मदत केली आहे. अशा विविध प्रकारच्या मदतीचा हात त्यांनी समाजात सर्वांना दिला आहे. कोणतीही प्रकारची समस्या असो त्यातून मार्ग काढून त्या सोडविल्या आहेत, अशी बरीच कामे ते करीत असतात.





**उरण : सामाजिक कार्यकर्ते जयंत बाळकृष्ण गांगण यांचा ७५वा वाढदिवस सामाजिक उपक्रम राबवून साजरा झाला. जयंत गांगण यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून उरण चारफाटा येथे झोपडपट्टीतील गोरगरीब मुलांना मोफत अन्नदान करण्यात आले. आमदार महेश बालदी यांनीही जयंत गांगण यांची प्रत्यक्ष भेट घेत त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.**

# रसायनीत दीड दिवसाच्या गणपतींना भावपूर्ण निरोप



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

सर्वांचे लाडक्या बाप्पांचे शनिवारी तालुक्यासह जिल्ह्यात मोठ्या जल्लोषात स्वागत झाले. दीड दिवसाचा बाप्पा पाहुणा आल्याने मोहोपाडा रसायनीत रात्रभर जागरण करून परिसरात ठिकठिकाणी महिलांचे पारंपारिक नृत्य झाले.

घरोघरी गणपती बाप्पाचे गाणी ऐकावयास मिळाले. दुसऱ्याच दिवशी दिड दिवसाच्या बाप्पाचे विसर्जन करताना पावसाने उसंत घेतल्याने मोहोपाडा तलाव, पाताळगंगा नदी, रिस पुल, वावेघर घाट, गुळसुंदे आदी ठिकाणी वाजतगाजत गणरायाला भावपुर्ण निरोप देण्यात आला. या वेळी कोणी बाप्पाला डोक्यावर, वाहनातून, सजवलेल्या हातगाडीवरून विसर्जनस्थळी घेऊन जात असल्याचे दिसून आले.

या वेळी गणेशभक्तांनी गणपती बाप्पा मोरया, पुढल्या वर्षी लवकर या च्या जयघोषात रसायनीत दीड दिवसांच्या गणपतींना भावपुर्ण निरोप देण्यात आला. आपल्या लाडक्या बाप्पाला अगदी आनंदाने निरोप देण्याची तयारी परिसरात सुरू असल्याचे पहावयास मिळाले.



**पनवेल : भाजप महिला मोर्चा शहर उपाध्यक्ष अरुणा पाटील यांच्या घरी विराजमान गणरायाचे माजी नगरसेविका दर्शना भोईर तसेच कविता पाटील, निलम पाटील, मानसी पाटील, स्मिता पाटील, हर्षाली फुलोरे आदींनी दर्शन घेतले.**



**सतिश उगले, कळंबोली**



**आदित्य अरविंद वैद्य, अलिबाग**



**चेतन चंद्रकांत जाधव, कळंबोली**



**विठोबा दामोदर मढवी, वाशी, पेण**




**राज पाटील, चिखले, पनवेल**

# रोह्यात विजेचा लपंडाव सुरूच

## गणेशोत्सवाच्या काळातही नागरिकांना दिलासा नाही

**रोहे : प्रतिनिधी**

रोहा शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागात सातत्याने विजेचा लपंडाव सुरू आहे. ऐन गणेशोत्सवाच्या दरम्यान सातत्याने वीज खंडित होत असल्याने नागरिक हैराण झाले असून नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.



कोकणातील सर्वांत मोठा उत्सव म्हणजे गणेशोत्सव. या उत्सवाला शनिवारपासून सुरुवात झाली आहे. शहरासह ग्रामीण भागात सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ व गणेशभक्तांकडे गणराय विराजमान झाले आहेत. सर्वत्र गणेशोत्सवाची धामधूम सुरू आहे. गणेशोत्सवादरम्यान घरात सजावट, विद्युत रोषणाई करण्यात आली आहे, परंतु गणपती आगमन झाल्यापासून सातत्याने वीजपुरवठा खंडित होत असल्याने नागरिक हैराण झाले आहेत.

शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागात गणेश विविध सांस्कृतिक, आध्यात्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहे, परंतु वीज खंडित होत असल्याने या कार्यक्रमात व्यत्यय येताना दिसत आहे.

सातत्याने वीज खंडित होत असल्याने याचा फटका छोट्या व्यावसायिकांना बसत असल्याचे दिसून येते. यामध्ये प्रामुख्याने दूध डेअरी, लॉन्ड्री, पिठाची चक्की, सायबर कॅफे, हॉटेल आदी व्यावसायिकांना वीज खंडित होत असल्याने फटका बसताना दिसत आहे. वीज खंडित होण्याचा सर्वाधिक त्रास ग्रामीण भागात होताना दिसत आहेत.

ग्रामीण भागात परगावी असलेले विशेषतः मुंबई, पुणे येथे असलेले ग्रामस्थ गणेशोत्सवानिमित्ताने आपल्या गावी आले आहेत. सातत्याने वीज जात असल्याने त्याचा त्रास त्यांना जाणवत आहे. वीज खंडित होणे यासाठी ठोस उपाययोजना करण्याची मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# माथेरानमधील कड्यावरचा गणपती ठरतोय पर्यटकांसाठी आकर्षण

**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरानच्या डोंगरात एका मोठ्या दगडामध्ये नेरळ-माथेरान-नेरळ मिनीट्रेनची धुरा सांभाळणारे राजाराम खडे यांच्या मध्यातून कड्यावरचा गणपती साकारला आहे. पर्यटकांसाठी हा गणपती आकर्षण ठरत आहे.

२००५मध्ये माथेरानच्या डोंगरात भुस्खनन झाल्याने मिनीट्रेन बंद पडली होती. त्या वेळी खडे त्या दगडाच्या कड्यावर पोहचले. तेथे काळ्या पाषाणातील त्या दगडाला लोखंडी पत्र्याच्या सहाय्याने गणपतीच्या तोंडाचा आकार देण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर खडी आणि सिमेंट यांच्या सहाय्याने हात तयार केले. त्या चार हातात गणपती बाप्पाची






चार आयुधे दिली. बाप्पाचा आकार आल्याचे लक्षात येताच राजाराम खडे यांनी आपले सहकारी विश्वनाथ भोसले आणि राजीव शिंदे यांच्या मदतीने गवंडी काम करून कड्यावरचा गणपती घडविला. ही सर्व कामे करतांना राजाराम खडे यांनी लोखंड, सिमेंट, वाळू, खडी आदी वस्तूंची नेरळ-माथेरान घाटरस्त्याने तसेच मिनीट्रेन सुरू झाल्यानंतर मिनीट्रेनमधून नेऊन पूर्ण केले.

४७ मीटरच्या दगडी कड्याला गणेशाच्या भक्तीमुळे आकार देण्याचा प्रयत्न यशस्वी झाल्यानंतर राजाराम खडे यांनी गणेशापुढे मोदक असावा म्हणून साडेपाच फूट असा उंचीचा आणि एका व्यक्तीच्या कवेत येणार नाही इतका मोठा मोदक सिमेंटच्या सहाय्याने तयार केला.

सात फूट उंचीचा उंदीर बनविला.एखाद्या व्यक्तीच्या उंचीपेक्षा मोठ्या आकाराचा उंदीरमामा असावा ही गोष्ट निसर्गराजा गणपती येथे शक्य झाली आहे. त्या कड्यावरचा गणपतीला संपूर्ण रंगरंगोटी करण्यासाठीदेखील अडचण निर्माण होऊ नये म्हणून लोखंडी शिड्या बनविण्यात आल्या आहेत. नेरळ-ममदापुर येथील बाळू कारले यांनी सुंदर, आकर्षक दिसेल असे रंगकाम पूर्ण केले आहे. त्यामुळे मिनीट्रेनमधून प्रवास करणारा पर्यटक गणपतीकडे पाहून दगडात कोरलेल्या गणेशाच्या मूर्तीचे कौतुक करीत असतात.

# पोलादपूर तालुक्यातील सडे ग्रामस्थांचा शिवसेनेत प्रवेश

**पोलादपूर : प्रतिनिधी**

आमदार भरत गोगावले यांच्या कार्यपद्धतीवर विश्वास ठेवून तालुक्यातील सडे ग्रामस्थांनी शेकापक्षातून शिवसेनेत जाहीर प्रवेश केला.

प्रवेशकर्त्यांनी गेल्या दोन वर्षांमध्ये आमदार भरत गोगावले यांनी संपूर्ण मतदारसंघात कामे केली आहेत. प्रत्येक गाव वाडीवस्तीवर विकासकामे झाल्यामुळे आनंदाचे वातावरण आहे. म्हणून प्रत्येक गावातील आमदार साहेबांवर विश्वास ठेवून शिवसेनेत जल्लोषात प्रवेश घेत आहेत, अशी भावना व्यक्त केली.

या वेळी रामचंद्रबुवा सालेकर, बाळकृष्णबुवा सालेकर, रामचंद्र सालेकर, नारायणबुवा सालेकर, बाळा सालेकर, संजू सालेकर, विठ्ठल सालेकर, मनोहर पवार, सुनील महादेव सालेकर, मंगेश तुळशीराम सालेकर, लक्ष्मण सालेकर, नारायण सालेकर, निवृत्ती सालेकर, कृष्णा सालेकर, रमेश सालेकर, संजय सालेकर, तुकाराम सालेकर, बाळकृष्ण सालेकर आणि इतर ग्रामस्थांनी प्रवेश केला.

तालुका संपर्कप्रमुख किशोर जाधव, सहसंपर्क प्रमुख कृष्णा कदम, युवासेना संपर्क प्रमुख विजय शेलार, महिला संपर्क प्रमुख सुगंधाताई मोरे, उपतालुका प्रमुख गणपत उतेकर, विभाग प्रमुख विठ्ठल पार्टे, युवा नेते चंद्रकांत सणस, शिवाजी उतेकर, कार्यकर्ते या वेळी उपस्थित होते.



# माणगावात मुख्यमंत्री सहाय्यता निधीअंतर्गत सुविधा उपलब्ध

**माणगाव : प्रतिनिधी**

शहरातील अल्फा हॉस्पिटलमध्ये गंभीर आजार व इतर शस्त्रक्रिया उपचाराकरीता मुख्यमंत्री सहाय्यता निधीची सुविधा उपलब्ध झाली असल्याची माहिती डॉ.इस्माईल राहटविलकर यांनी दिली.

या हॉस्पिटलमध्ये मुख्यमंत्री सहाय्यता निधीला १ एप्रिल २०२४ रोजी शासनाकडून अधिकृत मान्यता मिळाली आहे. बायपास,बोन मॅरो प्रत्यारोपण, अस्थिबंधन, कर्करोग (केमोथेरपी/रेडिएशन), कॉकलियर इम्प्लांट, हाताचे प्रत्यारोपण,मेंदूचे आजार,लहान बालकांची शस्त्रक्रिया, विकृत प्रत्यारोपण, हिप रिप्लेसमेंट, हृदयरोग, नवजात शिशूंचे आजार, किडणी प्रत्यारोपण, कर्करोग शस्त्रक्रिया, डायलिसिस, गुडघ्याचे प्रत्यारोपण, फुफ्फुस प्रत्यारोपण, रस्ते अपघात, बर्न रुग्ण यांसारखे गंभीर आजार व इतर शस्त्रक्रिया आणि उपचार कमी खर्चात होतील. यासाठी आधार कार्ड, रेशन कार्ड, उत्पन्नाचा दाखला व रुग्णाचा फोटो इत्यादी कागदपत्रे आवश्यक आहेत.

# जेएसएम कॉलेजमध्ये एनएसएस युनिटचे नियोजन सत्र उत्साहात



**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

मुंबई विद्यापीठ आणि जेएसएम कॉलेज एनएसएस युनिटच्या माध्यमातून राष्ट्रीय योजना कार्यक्रम अधिकाऱ्यांसाठी रायगड जिल्हास्तरीय नियोजन सत्र झाले.

या कार्यक्रमासाठी जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष अ‍ॅड. गौतम पाटील, सुशील शिंदे, रमेश देवकर, तुळशीदास मोकल, निखिल कारखानीस, प्राचार्या डॉ. सोनाली पाटील, डॉ. प्रविण गायकवाड, प्रा. अश्विनी आठवले, डॉ. पंकज घरत तसेच रायगड जिल्ह्यातील विविध महाविद्यालयातील ८० एनएसएस कार्यक्रम अधिकारी सहभागी झाले होते.

सुशील शिंदे यांनी, राष्ट्रीय सेवा योजना ही एक प्राध्यापकांकारिता संधी आहे ज्यामध्ये प्राध्यापक विद्यार्थ्यांसोबत सामाजिक उपक्रम राबवून व्यक्तिमत्व विकास साधू शकतात.

अ‍ॅड. गौतम पाटील यांनी, एनएसएस हे एक व्यक्तिमत्व विकासाचे व समाजसेवेचे उत्कृष्ट माध्यम आहे, तसेच त्यांनी आपण एनएसएस स्वयंसेवक म्हणून काम करत असतानाचे अनुभव सांगितले. आपल्या मनोगताच्या शेवटी अध्यक्ष अ‍ॅड. गौतम पाटील यांनी नियोजन सत्रासाठी शुभेच्छा दिल्या व मुंबई विद्यापीठाने जेएसएम कॉलेजला नियोजन सत्र आयोजित करण्याची संधी दिली त्याबद्दल आभार व्यक्त केले.

या वेळी महाविद्यालयाचे एनएसएस कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रविण गायकवाड यांची विभागीय समन्वयकपदी नियुक्ती करण्यात आली. त्यांना मुंबई विद्यापीठाचा रायगड जिल्हास्तरीय उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी पुरस्कार मिळाला म्हणून मुंबई विद्यापीठाचे एनएसएस कार्यक्रम अधिकारी रमेश देवकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# वर्षा कुवळेकर, अजित देशमुख यांच्या पुस्तकांना पुरस्कार

**अलिबाग : प्रतिनिधी**

लेखिका वर्षा कुवळेकर लिखित 'सावळ्या विठ्ठलाच्या देशात' आणि लेखक अजित देशमुख लिखित 'पोलीस मन' या दोन्ही पुस्तकांना मानाचा असा दत्तात्रेय कृष्णा सांडू-चेंबूरचा पुरस्कार नुकताच जाहीर झाला आहे. ओघवत्या, पण सरळ आणि सोप्या भाषेत लिहिलेल्या दोन्ही पुस्तकांचे लेखक अलिबागचेच आहेत.

आफ्रिकेतील केनिया देशातील नैरोबी या शहराला भेट देऊन आलेल्या वर्षा कुवळेकर यांच्या 'सावळ्या विठ्ठलाच्या देशात' या पुस्तकाला, तर आयुष्याची ३५ वर्षे पोलीस सेवेत व्यतीत करून एसीपी म्हणून निवृत्त झालेल्या राष्ट्रपती पदक विभूषित अजित देशमुख यांनी लिहिलेल्या 'पोलीस मन' या पुस्तकालाही हा पुरस्कार मिळाला आहे. खाकी वर्दीत असलेल्या आपल्या समाजरक्षण करणाऱ्या पोलिसांनाही मन-भावना-कुटुंब नातीगोती असतात आणि कर्तव्य निभावताना त्याचं तारतम्य बाळगावे लागते याचे दृश्यवर्णन देशमुखांनी त्यांच्या पुस्तकात केले आहे. असाच कीर्तीमान पुरस्कार यापूर्वीही अजित देशमुखांच्या पुस्तकाला सर्वद फाऊंडेशन यांच्यातर्फे प्राप्त झाला आहे.

वर्षा कुवळेकर या गृहिणी आहेत. त्यांचे हे दुसरे पुस्तक असून 'सावळ्या विठ्ठलाच्या देशात' या पुस्तकाला यापूर्वी मराठी साहित्य परिषदेचा सावित्रीबाई फुले पुरस्कार, सर्वद फाऊंडेशनचा स्टार पुरस्कार आणि सारांश मासिकातर्फे साहित्य पुरस्कार' प्राप्त झाला आहे. अलिबागकरांना अभिमान वाटेल असा साहित्य पराक्रम देशमुख व कुवळेकर यांनी केल्याबद्दल त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# हिराजी पाटील एज्युकेशन सोसायटीतर्फे शिक्षकांचा सन्मान



**पेण : प्रतिनिधी**

हिराजी पाटील एज्युकेशन सोसायटीतर्फे संस्थेतील शिक्षकांचा सन्मान सोहोळा शरद पवार भवन इमारतीत आयोजित करण्यात आला होता.

या वेळी आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन जितेंद्र जयवंत पाटील मुख्याध्यापक, श्री चंडिकाई देवी विद्यामंदिर आरव व जानवी जितेंद्र पाटील यांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाला सोसायटीचे संस्थापक हिराजी पाटील, अध्यक्षा शशिकला पाटील, उपाध्यक्ष लिलानाथ पाटील, खजिनदार रमेश तांडेल, प्रमुख पाहुणे मनिष भोसले आदींसह संस्थेचे कर्मचारी व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दीड दिवसाच्या गणपतीला निरोप

**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुक्यातील शहरी, तसेच सर्व ग्रामीण भागात दीड दिवसाच्या गणपतींना भावपूर्ण निरोप देण्यात आला.

पेण शहर आणि तालुक्यात सुमारे ४८० दीड दिवसीय गणराज विराजमान झाले होते. विसर्जनानिमित्त सर्वच ठिकाणच्या नदीकाठांवर, तलावांवर, तसेच ओढ्यांवर गणेशभक्तांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती.

पावसाने चांगली उघडीप घेतल्याने विसर्जनानिमित्त मोठ्या प्रमाणात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. विसर्जन मिरवणूक काढण्यासाठी पावसाचे विघ्न आले नाही. भुंडा पूल येथील विसर्जन घाट आणि कासार तळ्यावर गणेशभक्तांनी मोठी गर्दी केली होती.

अनुचित प्रकार घडू नये, यासाठी ठिकठिकाणी पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता, तसेच पेणमधील प्रत्येक विसर्जन घाटावर पेण नगर परिषदेचे अग्निशमन दलाचे कर्मचारी महत्त्वाची भूमिका बजावताना दिसत होते.



# केळीच्या पानाला पर्याय म्हणून कर्दळीच्या पानांची विक्री

**खोपोली : प्रतिनिधी**

गणेशोत्सवामध्ये केळीच्या पानामध्ये पंचपक्वान्न खाल्ले जात, परंतु केळीचे पान दुर्मिळ झाल्यामुळे त्याला पर्याय म्हणून पावसाळ्यात डोंगराच्या कुशीत केळीसारखी दिसणारी कर्दळीची पाने खोपोली, चौक, मोहपाडा बाजारपेठेत विक्रीस येत आहे.



गणपती उत्सव हा कोकणामध्ये मोठ्या उत्साहाने साजरा करण्याची परंपरा असून कामानिमित्त बाहेर गेलेली मंडळी एकत्र येत असतात. गणेशोत्सवामध्ये केळीच्या पानामध्ये जेवायची परंपरा आहे, मात्र केळीची पाने दुर्मिळ झाल्याने त्याला पर्याय म्हणून कर्दळीच्या पानांचा वापर केला जात आहे.

कर्दळीचे पान हे थंड असल्यामुळे अन्न पचनांस सोपे जाते. शिवाय उत्सव म्हटले प्रत्येकाची लगबग असते. अशा वेळी हे कर्दळीचे पान महिला वर्गासाठी प्रर्वणी वाटते.


सिडको
शहरांचे शिल्पकार

## नोटीस-१

साडेबावीस टक्के योजनेअंतर्गत वाटप भूखंडाचे हस्तांतरण ''ना हरकत पत्र'' मागणी अर्जानुसार नोटीस सर्व शुभांगी **१) शारदा विजय कोकणे २) पंढरीनाथ कुंडलीक दिघे ३) विजय त्रिंबक भडके ४) मच्छिंद्र काशिनाथ वाढवणे ५) सुनिल विश्वनाथ वाढवणे ६) अनिल विश्वनाथ वाढवणे ७) शशिकांत विश्वनाथ वाढवणे राहणार - मु. बेलोंडेखार, ता. उरण, जि. रायगड -४०० ७०२** -------- (अर्जदार).

ज्याअर्थी उपरोक्त अर्जदारांनी खाली उल्लेखीत २२.५% योजनेअंतर्गत त्यांना वाटप करण्यात आलेल्या भूखंडाचे १) माधवी विकास बडे २) सुषमा नितीन घुगे ३) अविनाश किसन वाघमारे यांचे नावे हस्तांतरण करण्याकरीता ''ना हरकत प्रमाणपत्रासाठी'' मागणी अर्ज केला आहे. त्यामधील समाविष्ट भूखंडाचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| हस्तांतरण अर्ज क्रमांक | अर्जाचा दिनांक | हस्तांतरण करावयाच्या मालमत्तेचा तपशील | | | | वाटप दिनांक | भाडेपट्टा करार नोंदणी दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नोड | सेक्टर | भूखंड क्रमांक | क्षेत्र (चौ.मी.) | | |
| १२८२ | २९.०८.२०२४ | पुष्पक नोड | २७ | ७८ | ३३० चौ.मी. | ०१.०९.२०२३ | १५.०९.२०२३ |

या नोटीसद्वारे सदर हस्तांतरणाबाबत कोणत्याही हितसंबंधित व्यक्तीस / संस्थेस हरकत / तक्रार नोंदवण्याची असल्यास नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाच्या मुदतीमध्ये लेखी स्वरूपात आवश्यक त्या पुराव्यासहीत **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन), १ ला मजला, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर** या कार्यालयात सादर करण्यात यावी. उक्त १५ दिवसाच्या मुदतीमध्ये कोणतीही हरकत लेखी स्वरूपात या कार्यालयात प्राप्त न झाल्यास, सदर ''ना हरकत प्रमाणपत्र'' देणेस कोणत्याही प्रकारची हरकत नाही असे गृहीत धरण्यात येईल व हस्तांतरणाची पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
**(भूसंपादन)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/२१५/२०२४-२५



## दि पनवेल को अर्बन बँक लि.

**४७१, टिळक रोड, कापड बाजार, पनवेल-रायगड**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ९८, १५६ व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम १०७ नुसार

### जाहीर लिलाव नोटीस

श्री. देवचंद जनार्दन कोळी रा. जेसल मेलोडी, ६०४, प्लॉट नं. ३०३/२, तक्का इंडिअन ऑईल पेट्रोल पंपाच्या मागे, ता. पनवेल, जि. रायगड यांनी दि पनवेल को ऑप अर्बन बँक लि यांच्याकडून घेतलेल्या कर्जाचा भरणा न केल्यामुळे सहकारी न्यायालय अलिबाग, रायगड यांच्या कडे दावा क्र. सीसी/आरजीडी/९०/२०२१ निशाणी क्र.३८ दाखल करून बँकेने हुकुमनामा मिळविला आहे. सहकारी न्यायाल्याने सदरील व्यक्तीच्या मिळकती जप्त करून कर्ज रकमा, त्यावरील व्याज व त्यावरील अनुषंगिक खर्च वसूल करण्याचा हुकुम केला आहे. तसेच खाली सही करणाऱ्यानेसुद्धा वेळोवेळी आदेश काढून गहाण ठेवलेली मिळकत दिनांक.१३.०६.२०२३ रोजी जप्त केली आहे.

तरी सर्व लोकांस कळविण्यात येते की, श्री. देवचंद जनार्दन कोळी यांनी दि पनवेल को ऑप अर्बन बँक लि यांच्याकडून घेतलेल्या कर्जासाठी खालील नमूद केलेल्या गहाण ठेवलेल्या मिळकतीचा लिलाव जसे आहे आणि जेथे आहे त्या परस्थितीत शुक्रवार दि.१०/१०/२०२४ रोजी सकाळी ठीक ११.३० वाजता बँकेच्या ४७१, टिळक रोड, कापड बाजार, पनवेल येथील बँकेच्या मुख्य कार्यालयात करण्यात येणार आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कर्जदाराचे नाव आणि पत्ता | मिळकतीचे वर्णन | एरिया |
|---|---|---|---|
| १. | श्री. देवचंद जनार्दन कोळी रा. जेसल मेलोडी, ६०४, प्लॉट नं. ३०३/२, तक्का, इंडिअन ऑईल पेट्रोल पंपाच्या मागे, ता. पनवेल, जि. रायगड | मौजे पनवेल महानगर पालिका हद्दीतील तक्का येथील शॉप नं. ११, तळ मजला, श्री सिद्धीविनायक कॉम्प्लेक्स, प्लॉट नं.४२२, तक्का गाव, ता. पनवेल जि. रायगड | ११.१५ स्क्वेअर मीटर (कारपेट एरिया) आणि ३.७२ स्क्वेअर मीटर (लॉप्ट एरिया) |

सदरील कर्जाची दि.३१.०५.२०२४ पर्यंत थकबाकी रु.२१,३०,७०३/-(अक्षरी एकवीस लाख तीस हजार सातशे तीन रुपये मात्र) अधिक ०१.०६.२०२४ पासून पुढील होणारे व्याज अधिक होणारा खर्च. माननीय जिल्हा उपनिबंधक साहेब अलिबाग यांनी जरी त्यांच्या आदेशाने सदरील मिळकतीची अपसेट किंमत रु.२१,६०,०००/-एवढी मान्य केली असली, तरी बँकेने दुय्यम निबंधक कार्यालय पनवेल यांच्याकडून सदरील मिळकतीचे मुल्यांकन मागविले असता त्यांनी सदर मिळकतीचे रु.२१,६०,०००/-एवढे मुल्यांकन करून दिले आहे त्यामुळे त्यापेक्षा कमी रकमेची बोली रक्कम स्वीकारली जाणार नाही. लिलावात भाग घेणाऱ्यांनी इसारा रक्कम बँकेच्या नावाने बँकेत अनामत रक्कम म्हणून राष्ट्रीयकृत बँकेच्या डिमांड ड्राफ्टने रु.१,०८,०००/-वरील लिलावाच्या तारखेच्या किमान ५ दिवसापूर्वी (कामकाजाच्या दिवशी) भरणा करावा लागेल जास्तीत जास्त बोली लिलावामध्ये मंजूर केली जाईल.त्यावेळी त्या व्यक्तीला त्याच्या बोली रकमेच्या १/३ रक्कम बँकेत लिलावाच्या तारखेपासून आठ दिवसाच्या आत अनामत म्हणून भरावी लागेल. तसेच बाकीची संपूर्ण रक्कम लिलावाच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत भरावी लागेल. त्यानंतरच बँक त्यांच्या मिळकतीचा विक्रीचा दाखला देईल. तसेच स्टॅम्प ड्युटी, नोंदणी खर्च व इतर खर्च लिलाव घेणाऱ्याने करावयाचा आहे.

कोणतेही कारण न देता लिलाव मंजूर करणे अथवा नाकारण्याचा संपूर्ण अधिकार वसुली व विक्री अधिकारी यांच्याकडे राखून ठेवण्यात येत आहे. लिलावाच्या बाकीच्या सर्व अटी व नियम शाखाधिकाऱ्यांकडे व खालील सही करणाऱ्यांकडे उपलब्ध आहेत व त्या बँकेच्या कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील आणि त्या लिलावामध्ये भाग घेणाऱ्यांस बंधनकारक आहेत याची नोंद घ्यावी.

स्थळ : पनवेल
दिनांक : ०९.०९.२०२४.
संदर्भ क्र.: ६०/२५०/२०२४-२५

**सही/-**
**वसुली व विक्री अधिकारी**
दि पनवेल को ऑप अर्बन बँक लि पनवेल

## निवडक

### लोकशाही दिनी चार अर्ज निकाली

**नवी मुंबई :** कोकण विभागीय लोकशाही दिन कोंकण भवनमध्ये उपायुक्त (सामान्य प्रशासन) अमोल यादव यांच्या अध्यक्षतेखाली झाला. या वेळी नागरिकांनी आपल्या तक्रारी मांडल्या. त्यांच्या समस्या जाणून प्रकरणे उचित कार्यवाहीसाठी संबंधित कार्यालयांकडे पाठविण्यात आली. या वेळी विभागीय स्तरावरील विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. कोकण विभागीय स्तरावर आतापर्यंत झालेल्या लोकशाही दिन कार्यक्रमात एकूण प्रलंबित अर्जांची संख्या १० असून आलेल्या अर्जांची संख्या दोन आहे, असे एकूण प्राप्त अर्ज १२ होते त्यापैकी चार अर्ज निकाली काढण्यात आले असून आठ अर्ज प्रलंबित आहेत.

### 'युईएस'मध्ये शिक्षक दिन

**उरण :** युईएस स्कूल, ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स ॲण्ड कॉमर्स ॲण्ड कॉलेज ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड टेक्नॉलॉजीमध्ये वर्गशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली दहावीच्या विद्यार्थ्यांनी पहिली ते नववीच्या विद्यार्थ्यांना तर बारावीच्या विद्यार्थ्यांनी अकरावीच्या विद्यार्थ्यांना शिकविले. या कार्यक्रमाला युईएस सिनिअर कॉलेजच्या प्रभारी प्राचार्या, स्कूल व ज्युनिअर कॉलेजच्या प्राचार्या, सिनिअर कॉलेजच्या विभाग प्रमुख तसेच माध्यमिक, प्राथमिक व पूर्व-प्राथमिक विभागातील पर्यवेक्षिका आणि समन्वयक उपस्थित होते. त्यानंतर सर्व मान्यवर आणि प्रत्येक विभागातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी ह्या सर्वांना श्रीफळ देऊन गौरविण्यात आले.

# टायर, डिझेल चोरणारे गजाआड

**पनवेल : वार्ताहर**

टायरसह डिझेल चोरी करणाऱ्या दुकलीला पनवेल शहर पोलिसांनी गजाआड केले असून यातील एक गुन्हेगार सराईत असल्याने त्याच्याकडून विविध प्रकारचे गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

पनवेल पोलीस ठाण्याच्या हद्दीतील ओवळे गाव परिसरात एका वाहनाच्या टायरची चोरी झाली होती. या संदर्भात वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक निरीक्षक प्रकाश पवार, सुषमा पाटील, उपनिरीक्षक विनोद लभडे, हवालदार अमोल पाटील, मिथुन भोसले, महेश पाटील, विशाल दुधे आदींचे पथक आरोपीचा शोध घेत होते. या वेळी आरोपी हे गव्हाण पाण्याची टाकी परिसरात येणार असल्याची खबर मिळाल्याने या पथकाने आरोपी शेरसिंह गणपतसिंह राठोड (रा.रबाळे) व आमिन निजाम सय्यद (रा. घणसोली) यांना ताब्यात घेतले असता त्यांनी गाडीचे टायर रिंगसह चोरल्याचे कबूल केले.

आरोपींनी माल फिरस्ता भंगार विक्रेत्यास विकल्याचे सांगितले. त्याचप्रमाणे जेएनपीटी रोडवरील उभ्या असणाऱ्या ट्रकमधील डिझेल चोरी केल्याचे कबुल केले आहे. या आरोपींकडून अजून काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

# बेलापूर पोलीस ठाण्यात शिरला अजगर

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईतील बेलापूर पोलीस ठाण्यात शनिवारी पहाटे चारच्या सुमारास सात ते आठ फूट लांबीचा अजगर शिरला होता. काही पोलीस कर्मचाऱ्यांनी याची माहिती पुनर्वस फाऊंडेशनचे सर्पमित्र स्वप्नील साटम यांना दिली. स्वप्नील यांनी तातडीने धाव घेत शोध मोहीम राबवली. त्यावेळी टेबलखाली वेटोळे घालून बसलेले भलेमोठे अजगर आढळले.



स्वप्नील यांनी या अजगराला सुरक्षितरित्या पकडले. त्याला दुखापत झाली आहे की नाही याबाबत खात्री केली तसेच अजगराबद्दल व सापांबद्दल सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना माहिती दिली. अजगर, साप हे निसर्गचक्र सुरू राहण्यासाठी पृथ्वीवरील महत्वाचे घटक असल्याचे स्वप्नील यांनी माहिती देताना सांगितले. त्यामुळे सर्प आधळल्यावर त्यास मारू अथवा इजा पोहचवू नका, असे सांगत त्यांच्या मनातील भीती दूर केली.

मध्यरात्री येऊन अजगराला अत्यंत शिताफिने पकडल्याने मुख्य अधिकारी व पोलीस दलाने स्वप्नील यांचे कौतुक करत त्यांना प्रशंसापत्रक देऊन सन्मान केला. पुनर्वस फाऊंडेशन संस्थेचे आभार मानले. त्यानंतर या अजगराला सुरक्षितरित्या जंगलात सोडण्यात आले.

# 'रॉयल कॉस्मो'च्या जलतरणपटूंचे सुयश



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलमधील रॉयल कॉस्मो तरणतलावात सराव करणाऱ्या जलतरणपटूंनी उरण येथे झालेल्या रायगड जिल्हास्तरीय स्पर्धेत सुवर्ण आणि रौप्यपदके मिळवली आहेत. महेश बालदी मित्र मंडळ, उरण महापालिका व हौशी एक्वाटिक असोसिएशन उरण यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

आठ वर्षांखालील मुलींच्या गटात खुशी हिने ५० मीटर बटरफ्लायमध्ये प्रथम, ५० मीटर फ्री स्टाईलमध्ये द्वितीय आणि ५० मीटर बॅकस्ट्रोकमध्ये द्वितीय क्रमांक पटकावला. मुलांमध्ये ओम नलावडेने फ्री स्टाईलमध्ये प्रथम आणि बॅकस्ट्रोकमध्ये द्वितीय क्रमांक मिळविला. १४ वर्षाखालील गटात आर्यन शिंदेने ५० मीटर फ्री स्टाईल, ५० मीटर बटरफ्लाय व ५० मीटर ब्रेस्टस्ट्रोकमध्ये द्वितीय आणि फ्री स्टाईल रिलेमध्ये प्रथम क्रमांक प्राप्त केला. धैर्य दुर्गेश कदम याने फ्री स्टाईल रिलेमध्ये प्रथम क्रमांक पटकावला. जलतरणपटूंना रॉयल कॉस्मो येथील राष्ट्रीय स्तरावरील जलतरणपटू आणि प्रशिक्षक हसन शेख यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी जलतरणपटूंचे अभिनंदन होत आहे.

# 'सीकेटी'मध्ये करिअर मार्गदर्शन परिसंवाद



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

बारावीच्या विद्यार्थ्यांना करिअर नियोजन व विकासाचे महत्त्व समजावून देण्यासाठी नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) ज्युनिअर कॉलेजमध्ये करिअर मार्गदर्शन परिसंवादाचे आयोजन करण्यात आले.

या परिसंवादासाठी प्रमुख व्याख्याते म्हणून डॉ. अतुल गरगडे बी.ई. (मेकॅनिकल इंजिनिअरिंग), एम इ (रोबोटिक), पीएचडी (रोबोटिक) हे उपस्थित होते. या सेमिनारसाठी २४० विद्यार्थी सहभागी होते. व्याख्यात्यांनी विद्यार्थ्यांना व्यावहारिक अंतरदृष्टी आणि करिअरविषयक मार्गदर्शन तसेच सल्ले दिले. त्यांचा उपयोग विद्यार्थ्यांना करिअर निवडताना आणि करिअरमध्ये यश मिळवण्यासाठी होणार आहे.

सेमिनारसाठी ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे, पर्यवेक्षिका स्वाती पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

# सत्याग्रह महाविद्यालयात शिक्षक दिन साजरा

**नवी मुंबई : बातमीदार, प्रतिनिधी**

सत्याग्रह महाविद्यालयाच्या वतीने सर्वपल्ली डॉ. राधाकृष्णन यांच्या जयंतीचे औचित्य साधून शिक्षक दिनाचा कार्यक्रम शांताबाई रामराव सभागृह, खारघर, पनवेल येथे उत्साहात साजरा झाला. या कार्यक्रमात महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी शिक्षक दिनानिमित्त एक दिवस शिक्षकाची भूमिका साकारली, तर संस्थेतील शिक्षकांचा गौरव ज्येष्ठ विचारवंत प्रा. डॉ. जी. के. डोंगरगावकर यांच्या हस्ते करण्यात आला.




कार्यक्रमाची सुरुवात सर्वपल्ली डॉ. राधाकृष्णन यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण व दीपप्रज्वलन करून झाली. प्रा. ललिता यशवंते यांनी डॉ. राधाकृष्णन यांच्या जीवन आणि कार्यावर प्रकाश टाकला. प्रा. बी. बी. शिंदे यांनी त्यांच्या भाषणात डॉ. राधाकृष्णन हे एक शिक्षक, कुलगुरु आणि राष्ट्रपती म्हणून भारतीय शिक्षण प्रणालीतील प्रेरणास्थान असल्याचे सांगितले.

डॉ. जी. के. डोंगरगावकर यांनी वेदकाळापासून संविधानकाळापर्यंतची शिक्षण व्यवस्था आणि शिक्षकाची भूमिका विषद केली. त्यांनी सांगितले की, शिक्षणाचा अभ्यासक्रम काळानुसार बदलत जातो, परंतु शिक्षक म्हणून प्रभावी अध्यापन करण्याचे कौशल्य हे सर्वकालीन आवश्यक आहे. त्यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता युगातील शिक्षकाचे महत्त्व अधोरेखित केले आणि कृत्रिम बुद्धिमत्ता मानवी बुद्धिमत्तेला पर्याय होऊ शकत नसल्याचे प्रतिपादन केले.

या कार्यक्रम सिध्दार्थ मल्टिपरपज रेसिडेन्शल हायस्कूल, डॉ. जी. के. डोंगरगावकर इंटरनॅशनल स्कूल, अजिंठा इंटरनॅशनल स्कूल, डॉ. नेल्सन मंडेला आश्रमशाळा, सत्याग्रह अध्यापक महाविद्यालयातील शिक्षकांचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्राचार्या नेहा राणे यांनी केले. सुजाता भोसले यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. सुत्रसंचलन प्रा. बी. बी. शिंदे यांनी केले. प्रा. अमरचंद हाडोळतीकर, राजरत्न डोंगरगावकर, प्रा. डॉ. निधी अग्रवाल, नेहा कपोते, कवलजीत कौर, प्रमिला सणस यांच्य उपस्थितीसह मोठया संख्येने संस्थेतील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थितीत होते.



पनवेल : न्हावाखाडी येथील कान्हाशेठ ठाकूर, अरुणशेठ ठाकूर यांच्या निवासस्थानी विराजमान बाप्पा.



दत्तकुमार सावंत यांच्या मूळगावी नागवे (ता.कणकवली) येथील वडिलोपार्जित घरातील ९५ वर्षांपासूनचा पारंपरिक गणपती बाप्पा. सोबत दिव्या सावंत, दुर्वा सावंत आणि दीती सावंत.



विजय शिवराम हाळनर, खांदा कॉलनी, पनवेल



गौरव खांडेकर, डोंबिवली



उमेश पाटील, बारापाडा, पनवेल



अनिकेत काथारा, नेवाळी, पनवेल



भाजप काळुंद्रे बूथ अध्यक्ष विशाल धर्मा म्हसकर, पनवेल



मारुती गोविंद खंडागळे, डाऊरनगर, उरण



पनवेल : व्यावसायिक मिलिंद मोटघरे यांच्या निवासस्थानी विराजमान झालेल्या गणरायाचे शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक नितीन ठाकरे, पत्रकार संजय कदम, माधव शेवाळे व किरण सोनावणे यांनी दर्शन घेतले.



शांताराम चंदर घरत, चिरले, उरण



नवी मुंबई : कोपरखैरणे येथील जगदीश गंभीर यांच्या घरी शंखाच्या देखाव्यात स्थानापन्न गणराय.



प्रणय पाटील, कोप्रोली, उरण



अनिल जाधव, चिरनेर, उरण



प्रथमेश प्रकाश मोहिते, दादरपाडा, उरण



रामकृष्ण कोठावले, जांभूळपाडा, उरण

## निवडक

### हिरवळ महाविद्यालयात गणेशोत्सव साजरा

**माणगाव** : हिरवळ एज्युकेशन ट्रस्ट कॉलेज ऑफ सायन्स (कॉम्प्युटर सायन्स अँड इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी),



महाड येथे दरवर्षीप्रमाणे यावर्षीही महाविद्यालयाच्या प्रांगणात लाडक्या बाप्पाचे ढोलताशांच्या गजरात, लेझिमच्या तालावर जल्लोषात स्वागत करण्यात आले. या वर्षी विद्यार्थ्यांनी लाडक्या बाप्पासाठी पर्यावरणपूरक साहित्य वापरून सुंदर अशी बार्बाडोसमधील केन्सिंगटन क्रिकेट ग्राउंड प्रतिकृती तयार करून आरास केली होती. प्रमुख अतिथी म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य सुदेश कदम उपस्थित होते. सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत बाप्पाचे पूजन व आरती करण्यात आली.

### वाहतूक पोलिसांना प्रसादाचे वाटप



**माणगाव** : महामार्गावरील वाहतूक पोलिसांना गणेशोत्सवानिमित्त व्यापारी असोसिएशनतर्फे शनिवारी (दि.७) प्रसादाचे वाटप करण्यात आले. व्यापारी असोसिएशनच्या या कार्यक्रमास उपस्थित तालुक्याचे उपविभागीय पोलीस अधिकारी पुष्कराज सूर्यवंशी व माणगाव पोलीस निरिक्षक निवृत्ती बोऱ्हाडे यांच्याकडे माणगाव पोलीस चौकी येथे नवीन बसस्थानकाजवळ प्रसादाचे किट सुपूर्द करण्यात आले. या वेळी सहाय्यक महिला पोलीस निरीक्षक मीरा लाड, असोसिएशनचे अध्यक्ष लक्षमण दळवी, कार्याध्यक्ष विक्रांत गांधी, रमेश जैन, सचिन देसाई, विक्रांत मेहता, विपुल मेथा, सिध्दांत देसाई, मांगीलाल बिष्णोई, बाबुलाल राजपुरोहीत, जशराज प्रजापती, संजय ओसवाल, मांगीलाल कुमावत, रामलाल कुमावत आदी उपस्थित होते.

### सुरेखा तांबट यांना पुरस्कार

**माणगाव** : पंचायत समितीच्या वरिष्ठ विस्तार अधिकारी तथा प्रभारी गटशिक्षणाधिकारी सुरेखा मारुती तांबट यांना



आविष्कार फाउंडेशन रायगड शाखेच्या वतीने आदर्श विस्तार अधिकारी कार्यगौरव पुरस्कार जाहीर झाला आहे. सुरेखा तांबट या सामाजिक, शैक्षणिक कार्यात पुढकार घेत असतात. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन त्यांची राज्यस्तरीय आदर्श विस्तार अधिकारी कार्यगौरव पुरस्काराकरिता निवड केली आहे.

# रातवड येथील वीरगळींनी घेतला मोकळा श्वास

## आम्ही सह्याद्रीचे शिलेदार व दुर्गवीर प्रतिष्ठानतर्फे संवर्धन

**पाली : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा राज्य महामार्गावर असलेल्या रातवड या माणगाव तालुक्यातील गावात उंच अशा वीरगळी अडगळीत पडलेल्या होत्या. आम्ही सह्याद्रीचे शिलेदार व दुर्गवीर प्रतिष्ठानचे सदस्य आणि ग्रामस्थांनी मिळून येथे स्मारकाचे पहिल्या टप्प्यातील काम काही दिवसांपूर्वी करून या वीरगळी सुस्थितीत ठेवल्या आहेत. गणेशोत्सवानंतर या स्मारकाचा लोकार्पण सोहळा होणार आहे.



दुर्गवीर प्रतिष्ठानचे सदस्य ज्या ज्या वेळी मानगड, सुरगड श्रमदानासाठी किंवा इतर वेळीही मुंबई-गोवा महामार्गावरून जात असत तेव्हा या वीरगळ पाहत असत. महामार्गावर लागून रातवड येथे असलेल्या उंच उंच अशा वीरगळी पाहून यांना झाडाझुडुपातून काढून योग्य ठिकाणी म्हणजेच स्मारक स्वरुपात उभे करायचा असा मानस त्यांनी केला.

या वीरगळी अगदी आखीव रेखीव आहेत. ज्यांच्या स्मरणात त्या घडवल्या असतील त्यांचे शौर्य व पराक्रमाची साक्ष देणाऱ्या या वीरगळी आहेत. अखेर या वीरगळी संवर्धनाचा तो दिवस उजाडला, ग्रामस्थांशी सकारात्मक चर्चा झाली दुर्गवीरांनी आर्थिक बाजू निश्चित केली आणि गेल्या दोन-चार मोहिमेत स्मारकाच्या पहिल्या टप्यातील काम पूर्ण झाले.

वीरगळ योग्य ठिकाणी बसविण्यात आल्या. या मोठ्या मोठ्या अजस्त्र वीरगळी सर्वांनी मिळून अतिशय योग्य प्रकारे स्मारकापर्यंत नेल्या व बसविल्या. तिथे त्यांची योग्यप्रकारे साफसफाई करण्यात आली. हार घालून पूजन करण्यात आले. पुढील टप्प्यात त्याचे केमिकल संवर्धन होईल.

वीरगळ अभ्यासक अनिल दुधाने यांच्याकडून योग्य माहिती घेऊन तिथे माहिती फलक लावण्यात येणार आहे. या सर्व मोहिमेसाठी दुर्गवीर रामजी कदम, विठ्ठल केंबळे, प्रमोद डोंगरे, महेंद्र पार्ठे, किशोर सावरकर अन आम्ही सह्याद्रीचे शिलेदार व सुरेश उंडरे या सर्वांची साथ लाभली.

# माथेरानमध्ये दीड दिवसाच्या गणरायाला भक्तांकडून निरोप

**माथेरान : प्रतिनिधी**

सर्वांच्या लाडक्या गणरायाचे आगमन गणेशचतुर्थीला शनिवारी झाले. माथेरानमधील विविध भागात दीड दिवसाच्या गणरायाची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली होती. दीड दिवसानंतर रविवारी (दि.८) गणरायाला भक्तिमय वातावरणात निरोप देण्यात आला.

माथेरान शहरात दीड दिवसाचे एकूण ३३ गणपती बाप्पा विराजमान झाले होते. ढोल-ताशांच्या गजरात गणपती बाप्पा मोरया, पुढल्या वर्षी लवकर या असा जयघोष करीत लाडक्या बाप्पाला निरोप देण्यात आला. येथील महिलांसह बाळगोपाळ मंडळी मिरवणुकीत सहभागी झालेले दिसत होते. पावसाने उघडीप घेतल्याने सायंकाळी ४.३० वा. च्या सुमारास गणरायाची स्वारी घराबाहेर निघाली. बाजारपेठेतून बाप्पांची मिरवणूक विसर्जनस्थळी पोहचली.



पारंपरिक पद्धतीने प्रत्येकाने आपल्या गणपती बाप्पांची मूर्ती डोक्यावर घेऊन पायी चालत विसर्जनस्थळी नेली. येथे दूरवर असलेल्या इंदिरा गांधी नगर भागातील गणरायांचे विसर्जन तिथे जवळ असलेल्या मायरा पॉईंट येथील हरिसन स्प्रिंग येथे करण्यात आले.


बाप्पांच्या मिरवणुकीसाठी माथेरान नगर परिषद, पोलीस ठाणे आणि येथील सामाजिक कार्यकर्त्यांनी मोलाचे केले.

# खोपोलीतील स्मशानभूमी समस्याग्रस्त

**खोलीली : प्रतिनिधी**

खोपोली शहरातील मध्यवर्ती स्मशानभूमी मागील दोन दिवस विविध समस्यांमुळे नागरिकांच्या संतापाचे कारण बनले आहे. शेड असूनही अंत्यविधीसाठी लागणारी लाकडे उघड्यावर टाकण्यात आली असल्याने ती ओली झाली आहेत. यामुळे अंत्यविधी करण्यासाठी अडचणी येत आहेत.





योग्य व सुरळीतपणे अंत्यविधी होण्यासाठी खोपोली नगरपालिकेकडून एका अंत्यविधीसाठी ११०० रुपये ते २१०० रुपये अशी रक्कम घेतली जाते. जर नगरपालिकेकडून एवढ्या मोठ्या प्रमाणावर रक्कम वसूल केली जाते, तर त्या प्रमाणात सुविधा ही उपलब्ध करून देण्यासाठी जबाबदारी घ्यावी, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे. अंत्यविधीसाठीची लाकडे ओली असल्याने योग्य प्रकारे अंत्यविधीसाठी कमीत कमी १० ते १५ लिटर पेट्रोल किंवा रॉकेल व अग्निला पुरक म्हणून आठ ते दहा टायर लागत असल्याचे येथील वास्तव आहे.

नगरपालिकेकडून याबाबत योग्य त्या उपाययोजना तातडीने व्हाव्यात यासाठी शहरातील सामाजिक कार्यकर्ते व विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी लवकरच मुख्याधिकारी व प्रशासक डॉ. पंकज पाटील यांची भेट घेणार असल्याचे शिवसेना पदाधिकारी दिनेश जाधव यांनी सांगितले.

याबाबत पालिकेतील अधिकाऱ्यांना विचारले असता, शेड काही ठिकाणी गळत असल्याने व सततचा पावसामुळे लाकडे ओली झाली असून योग्य उपाययोजना केली जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# पेणमध्ये गणेशोत्सव काळात पोलीस प्रशासन सतर्क

**पेण : प्रतिनिधी**

गणेशोत्सवाच्या काळात आठवडाभर अगोदरपासूनच तालुक्याच्या मुख्य बाजारपेठेत मोठ्या संख्येने नागरिक खरेदीसाठी येत असतात. याचाच फायदा घेउन भुरटे चोर सोनसाखळी, पर्स, चोरत असतात, परंतु पोलीस निरिक्षक संदीप बागुल यांनी शहरात पोलीस बंदोबस्त तैनात केला आहे.



उपविभागीय पोलीस अधिकारी शिवाजी फडतरे यांच्या मार्गदर्शनाखाली दामिनी पथकाच्या फेऱ्यादेखील वाढविल्या. त्यामुळे गेल्या आठवडाभरात पेण शहरात कोणताही अनुचित प्रकार झाला नाही. शहराचे मुख्य रस्ते वगळता चारचाकी आणि दुचाकी वाहनांना मिर्ची गल्ली, लाल बहादुर शास्त्री मार्ग या मार्गांवर बंदी घालण्यात आली कारण गणोशोत्सवाच्या काळात अनेक महिला दागिने घालून बाजारपेठेमध्ये येत असतात. याचाच फायदा घेऊन भुरटे चोर आपले काम करीत असतात. हे लक्षात घेऊनच वाहनांना बंदी करण्यात आली.

त्याचप्रमाणे वाहतूक कोंडी होऊ नये म्हणून शहरातील काही रस्त्यांवर एकेरी वाहतुकीची सोयदेखील करण्यात आली होती. पेण पोलीस निरिक्षक स्वतः गस्त घालून करीत होते.

# कल्पसूत्र ग्रंथाचे भक्तिपूर्ण पूजन

**कर्जत : प्रतिनिधी**

जैन धर्मीयांच्या पवित्र अशा कल्पसूत्र ग्रंथाचे भक्तिपूर्ण पूजन करण्यात आले. यंदा हा बहुमान महावीर पेठेमध्ये राहणाऱ्या प्रसिध्द व्यापारी फुटरमल राणावत (ओसवाल) यांना मिळाला.

कल्पसूत्र ग्रंथाची मिरवणूक जैन मंदिरातून वाजत गाजत निघाली. या वेळी जैन मुनी दिव्यरत्न महाराज, चित्तरत्नजी महाराज, जशरत्नजी महाराज, हेत्तरत्नजी महाराज, निप्पारत्नजी महाराज यांच्यासह १७ जैन मुनी व जैन साध्वी या मिरवणुकीत सहभागी झाले होते. ही मिरवणूक फुटरमल जैन यांच्या निवासस्थानी आल्यानंतर ग्रंथाचे पूजन करण्यात आले. रात्री ग्रंथांच्या दर्शन सोहळ्यास सुरुवात झाली. ग्रंथाचे वाचन जैन मुनी व जैन साध्वी पाच दिवस करणार आहेत. डॉ. श्रीपाल जैन, प्रिन्स ओसवाल, अरविंद जैन, पंकज ओसवाल, राजेश राणावत, भरत राणावत, सचिन ओसवाल, रोहित बाफना, पियुष ओसवाल, प्रणय ओसवाल, वैभव ओसवाल आदी उपस्थित होते.



# चौकमध्ये गणरायाला भावपूर्ण निरोप

**चौक : प्रतिनिधी**

अतिशय उत्साही, ढोल-ताशांच्या गजरात आलेल्या गणपती बाप्पाला दीड दिवसानी निरोप देताना अनेकांच्या डोळ्यात अश्रू अनावर झालेले दिसत होते.

चौक परिसरातील चौक, तुपगाव, लोधीवली, नढाळ, भिलवले, कांढरोली, विणेगाव, बोरगांव, वरोसे, आसरे, हातनोली, जांभिवली, पाली, कोपरी, वयाळ आदी गावात वाजत-गाजत आलेले गणपती बाप्पा विराजमान झाल्यावर त्यांची विधिवत पूजा अर्चा, मोदकांचा नैवेद्य, आरती, भजन करून सेवा करण्यात आली. अतिशय अनंदायी वातावरण निर्माण झाले होते. रविवारी सायंकाळी उशिरा गणराय आपल्या घरी निघाले असता अनेकांनी साश्रू नयनांनी बाप्पांना निरोप दिला.



मोरबे धरणाची उपनदी धावरी हिला पाणी सोडण्यात आल्याने परिसरातील गावातील अनेक गणपती धावरी नदीच्या गणेशघाटावर आणण्यात आले होते, तर काही भिलवले नदी, जांभीवली नदीवर गेले. निर्माल्यासाठी कलश तयार ठेवले होते. लाईटची व्यवस्था करण्यात आली होती. गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर या अशी भावपूर्ण साद देत गणरायाला निरोप देण्यात आला.

# साले येथील एक गाव एक गणपती!

माणगाव तालुक्याच्या साले गावातील ग्रामस्थांनी स्वयंस्फूर्तीने एक गाव एक गणपती ही संकल्पना गेली अनेक वर्षे राबवित आहेत. ही परंपरा गेल्या १२० वर्षांपासून सुरू आहे.



ग्रामस्थांनी आपल्या या कृतीतून एक वेगळे अनुकरणीय पाऊल टाकत सर्वापुढे आदर्शच उभा केला आहे. गणेशभक्तांच्या नवसाला पावणारा म्हणून या गणपतीची ओळख आहे. म्हणूनच दरवर्षी या गणपतीच्या दर्शनाला महाराष्ट्रातून मोठ्या प्रमाणात भाविक येतात.




मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील माणगावपासून अवघ्या चार किमी. अंतरावर असलेले अत्यंत छोटे व निसर्गरम्य असे हे साले गाव आहे.

साले गावाच्या पश्चिमेला शिवगणेश मंदिर आहे. दरवर्षी गणेशचतुर्थीला भक्तगण या मंदिरात येतात. त्यानंतर गेल्यावर्षी गावाने बोललेला सामुहिक व वैयक्तिक असे नवस फेडले जातात. त्यानंतर पुन्हा नव्याने भक्त आपापले वैयक्तिक नवस बोलतात अशी प्रथा आहे. दुपारी १ वा.नंतर सजविलेल्या पालखीतून प्राचीन असणारी ही गणेशाची मूर्ती मंदिरालगत असलेल्या शिवकालीन तलावातून छातीभर पाण्यातून शंखनाद व मोरयाच्या गजरात फिरविली जाते. तलावातून पालखी फिरवण्याची ही प्रथा गेल्या कित्येक वर्षापासूनची आहे. हा पालखी सोहळासुद्धा अनेकांसाठी आकर्षणाचा भाग असतो. नंतर ही पालखी गावातूनही फिरविण्यात येते. त्यानंतर ही पालखी मंदिरात गेल्यानंतर आरती होऊन मूर्तीची पुन्हा स्थापना केली जाते.

गावातील कोणत्याही घरात वैयक्तिकरित्या अथवा दुसऱ्या सार्वजनिक गणपतीची स्थापना कोणीही करीत नाही, असे केल्यास त्याच्या घरात अरिष्ट येते, अशी तेथील ग्रामस्थांत समजूत आहे.

**-सुप्रिया संतोष शिंदे, माणगाव**

# अंनिस समितीचे पुरस्कार जाहीर

**पेण : प्रतिनिधी**

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचा आधारस्तंभ हा राज्यस्तरीय पुरस्कार रायगड जिल्ह्यातील अमित निंबाळकर तालुका (पाली), दिनेश शिर्के तालुका (रोहा) व जगदीश डंगर (पेण) , प्राचार्य सतीश पोरे तालुका (पेण) यांना जाहीर झाला आहे.

या चौघांचे रायगड जिल्ह्यातील वेगवेगळ्या माध्यमातून अभिनंदन होत आहे. हे पुरस्कार रविवारी (दि.१५) सानेगुरुजी स्मारक वडघर माणगाव येथे शेकडो कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत करण्यात येणार आहे.



## गणेश दर्शन



**माणगाव : सामाजिक कार्यकर्त्या सुवर्णा जाधव यांच्या निवासस्थानी गणराय.**



**माणगाव : नगरसेवक अजित तारलेकर यांच्या निवासस्थानी स्थानापन्न गणराय.** (छाया : सलिम शेख)

